# आविष्कार

२०२५–२६




नहि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते ।

सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे
कला महाविद्यालय, खामगांव

ACCREDITED WITH GRADE A+ NAAC
CGPA 3.32





संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नीत

# सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, खामगांव जि. बुलडाणा

।। प्रेरणास्थान ।।



सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे

।। मार्गदर्शक ।।



माजी मंत्री मा. डॉ. राजेंद्रजी शिंगणे

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगांव.

# आविष्कार

२०२५-२६

**मुख्य संपादक**

प्रा.डॉ. हर्षा ढाले

**सहसंपादक**

प्रा.डॉ. मनोहर वासनिक

**संपादक मंडळ**

कु. काजल क्षीरसागर (बी.ए. भाग -३)

कु. श्रद्धा गव्हांदे (बी.ए.भाग-२)

कु. योगिता गायकवाड (बी.ए. भाग-१)

रोहित डाबेराव (बी.ए.भाग-१)

**मुखपृष्ठ व मुद्रण**

उन्हाळे ग्राफिक्स, खामगांव

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगांव.

# आविष्कार

२०२५–२६

## संचालक मंडळ

| | |
|---|---|
| मा.ना.डॉ. राजेंद्रजी भास्करराव शिंगणे | अध्यक्ष |
| श्री. शंकरराव उत्तमराव जोशी | उपाध्यक्ष |
| डॉ. सद्गुण गोविंदराव देशमुख | सचिव |
| डॉ. नीलिमा दिगांबर देशमुख | सहसचिव |
| ॲड. राजेंद्र भाऊसाहेब कोल्हे | कोषाध्यक्ष |
| श्री. दिलीप गोविंदराव देशमुख | सदस्य |
| सौ. रजनी राजेंद्र शिंगणे | सदस्या |

## संचालित संस्था

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगांव.

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, खामगांव.

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे माध्यमिक विद्यालय व
उच्च माध्यमिक विद्यालय, बोरजवळा, ता. खामगांव.

स्वातंत्र्य सैनिक प्राचार्य स्व.गो. पू. देशमुख मानवसेवा छात्रालय,
बोरजवळा, ता. खामगांव.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगांव

# सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगांव.

## महाविद्यालयीन प्राध्यापक

| | |
|---|---|
| प्रा.डॉ. संजय पाटील | – प्राचार्य |
| प्रा.डॉ. हर्षा ढाले | – मराठी विभाग प्रमुख |
| प्रा.डॉ. प्रमोद चव्हाण | – इतिहास विभाग प्रमुख |
| प्रा.डॉ. नीलिमा देशमुख | – इंग्रजी विभाग प्रमुख |
| प्रा. डॉ. मनोहर वासनिक | – सहयोगी प्राध्यापक (इंग्रजी) |
| प्रा.डॉ. दयानंद राऊत | – समाजशास्त्र विभाग प्रमुख |
| प्रा. डॉ. गणेश विश्वकर्मा | – संचालक, शारीरिक शिक्षण विभाग |
| प्रा. गोपालकृष्ण राखोंडे | – राज्यशास्त्र विभाग प्रमुख |
| प्रा. डॉ. मालती सातव | – अधिव्याख्याता, गृहअर्थशास्त्र (तासिका तत्वावर) |

## ग्रंथालय विभाग

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. संदीप लांडे | – ग्रंथपाल |
| सचिन पाटील | – ग्रंथालय परिचर |

## प्रशासकीय विभाग

| | |
|---|---|
| प्रा.डॉ. संजय पाटील | – प्राचार्य |
| विशाल वि. देशमुख | – मुख्य लिपीक |
| धनंजय श्री. महाले | – वरिष्ठ लिपीक |
| संदीप सु. देशपांडे | – कनिष्ठ लिपीक |
| चंद्रसिंग सु.तोमर | – शिपाई |
| प्रमोद पी. पायस | – शिपाई |
| आनंद दि. चव्हाण | – शिपाई |
| सचिन श्री. अवताडे | – शिपाई |

# सचिवांचे मनोगत



सहकाराचं अधिष्ठान असलेले स्व. भास्करराव शिंगणे यांच्या कार्याच्या प्रेरणेतूनच सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे स्मृती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाची स्थापना १९९३ साली झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने २०००–२००१ मध्ये महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांचं उत्कट रूप म्हणजेच आविष्कार ! या वार्षिकांकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक वैचारिक व्यासपीठ निश्चितच मिळालेले आहे.

विद्यार्थी, प्राचार्य, संपादक मंडळ, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी यांच्या परिश्रमातून साकारलेल्या आविष्कार २०२५–२६ या अंकास तसेच विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा..!

**डॉ. सद्‌गुण देशमुख**
**सचिव,**
**सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे**
**शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ, खामगांव.**

# प्राचार्यांचे मनोगत



आपल्या महाविद्यालयाचा आविष्कार हा वार्षिकांक सादर करतांना खुप आनंद आणि समाधान होत आहे. दरवर्षी नियमितपणे हा वार्षिकांक प्रकाशित होतो. ही एक महत्वाची बाब आहे. हा वार्षिकांक म्हणजे महाविद्यालयाची ओळख. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासामध्ये त्यांच्यामधील कलागुणांना येथे वाव मिळत असतो आणि त्यामधून हे विद्यार्थी लिहिते होतात. विद्यार्थी लिहिते होणे म्हणजेच ते विचार करतात. विद्यार्थ्यांनी आपले विचार चिंतन येथे साकारलेले असते. शिक्षणाची हिच तर फलश्रुती असते, नाही का ? या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील उर्जा ही सकारात्मकतेकडे प्रवाहित होऊन एक सृजाण नागरिक होण्याचे दृष्टीने ही गोष्ट महत्वाची ठरते. येथे विविध विभागांच्या माध्यमातून राबविलेले विविध शैक्षणिक उपक्रमांसह विद्यार्थ्यांच्या सृजन गुणांचे दर्शन आपल्याला होईल. विद्यार्थ्यांनी उत्तरोत्तर आपल्या नवनिर्मितीक्षम गुणांचा आविष्कार करूण आपल्यासह आपले महाविद्यालय आणि पर्यायाने संपूर्ण समाज यांचेसाठी साह्यभूत व्हावे, ही अपेक्षा

डॉ. संजय पाटील
प्राचार्य,
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे
कला महाविद्यालय, खामगांव.

# संपादकीय



महाविद्यालयीन वार्षिकांक म्हणजे विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि साहित्यविषयक घडामोडींचा आलेख असतो. विद्यार्थ्यांच्या नानाविध कल्पनाशक्तीतून साकार झालेला आविष्कार २०२५– २६ चा अंक वाचकांसमोर सादर करताना मनस्वी आनंद होत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (A.I.) हा विषय सर्वानुमते ठरविण्यात आला . या एका विषयाला अनुसरून विद्यार्थ्यांच्या मनातील विविध भावना, विचारांच वादळ, भावनिक खळबळ शब्दबद्ध करण्यासाठी आविष्कार या अंकाची निर्मिती. या अंकामध्ये वैचारिक लेख, कविता, चारोळी इत्यादींच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्ता (A.I.) या विषयास पूरक असे लेखन विद्यार्थ्यांनी केलेले आहे.

प्रस्तुत अंकासाठी संस्थेचे सचिव मा. डॉ सद्गुणराव देशमुख, सहसचिव प्रा.डॉ. नीलिमा देशमुख यांची प्रेरणा तसेच संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील यांचे मार्गदर्शन तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

प्रा.डॉ. हर्षा ढाले
मुख्य संपादक

# अंतरंग


| अनु.क्र. | लेख/कविता | पा.क्र. |
|---|---|---|
| १ | वार्षिक अहवाल | ९ |
| | मराठी विभाग | |
| २ | कृत्रिम बुद्धिमत्ता AI मानवाला मिळालेले वरदान | १५ |
| ३ | कृत्रिम बुद्धिमत्ता विविध उपयोग आणि तोटे | १७ |
| ४ | गावामध्ये बदल घडविणारे ए.आय. | १९ |
| ५ | कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाज | २० |
| ६ | कृत्रिम बुद्धिमत्ता विविध फायदे व तोटे | २१ |
| ७ | कृत्रिम बुध्दिमत्ता : उपयोग आणि आवश्यकता | २४ |
| ८ | कृत्रिम बुध्दिमत्ता आणि सामाजिकता | २६ |
| ९ | डिजिटल फिंगरप्रिंट आणि ए.आय. | २७ |
| १० | कृत्रिम बुद्धिमत्ता आधुनिक युगातील क्रांती | २८ |
| ११ | कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे आणि तोटे | ३० |
| १२ | कृत्रिम बुद्धिमत्ता काळाची गरज | ३२ |
| | इंग्रजी विभाग | |
| १३ | **Annual Report of English Study Circle** | ३७ |
| १४ | **Artificial Intelligence and Humanity** | ३८ |
| १५ | **Disadvantages of Artificial Intelligence (AI)** | ४३ |
| १६ | **Mobile Phone** | ४५ |
| १७ | **Ethical View of Artificial Intelligence** | ४६ |
| १८ | **Technology and Human Life** | ४८ |

| अनु.क्र. | लेख/कविता | पा.क्र. |
|---|---|---|
| १९ | **Technology** | ५० |
| २० | **Digital Dawn** | ५१ |
| २१ | **Artificial Intelligence: The Mind We Made** | ५२ |
| २२ | **Artificial Intelligence** | ५३ |
| २३ | **AI and Students** | ५४ |
| २४ | मराठी वाङ्मय अभ्यास मंडळ | ५६ |
| २५ | इतिहास विभाग अहवाल | ५७ |
| २६ | राज्यशास्त्र विभाग अहवाल | ५८ |
| २७ | समाजशास्त्र विभाग अहवाल | ६० |
| २८ | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग | ६१ |
| २९ | ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग अहवाल | ६२ |
| ३० | गृहअर्थशास्त्र विभाग अहवाल | ६३ |
| ३१ | राष्ट्रीय सेवा योजना अहवाल | ६५ |
| ३२ | सांस्कृतिक विभाग अहवाल | ६८ |
| ३३ | राष्ट्रीय छात्र सेना अहवाल | ६९ |
| ३४ | राष्ट्रीय परिषद अहवाल | ७० |
| ३५ | | |
| ३६ | | |
| ३७ | | |
| ३८ | | |

# संपादक मंडळ



प्रा.डॉ. हर्षा ढाले
मुख्य संपादक



प्रा.डॉ. मनोहर वासनिक
सहसंपादक



कु. काजल क्षिरसागर
(बी.ए.भाग ३)



कु.श्रध्दा गव्हांदे
(बी.ए. भाग २)



कु. योगिता गायकवाड
(बी.ए.भाग १)



रोहित डाबेराव
(बी.ए.भाग १)

# वार्षिक अहवाल

सत्राच्या सुरुवातीला प्रथम वर्षात पदार्पण करणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभिक्रम प्रक्रिया या नावीन्यपूर्ण उपक्रमाने शैक्षणिक वर्षाची सुरुवात होऊन नवीन विद्यार्थ्याला महाविद्यालय जीवनाची ओळख करून देण्यात आली होती.

सर्व विभागांचे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास कसा साधला जाईल या अनुषंगाने वर्षभर उपक्रम राबविण्यात आलेत. यामध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाद्वारे संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय शेगाव येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करून विद्यार्थ्यांना ग्रंथालय विषयक विविध बाबींवर प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली. ग्रंथालय शास्त्राचे प्रणेते डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली.

मराठी विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन, सावित्रीबाई फुले जयंती तसेच विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादींचे आयोजन केले जाते.

मराठी राजभाषा दिनाच्या पर्वावर दरवर्षी आमच्या संस्थेतर्फे राज्यस्तरीय वैखरी पुरस्कारांचे वितरण केले जाते.
मराठी विभागाद्वारे दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव येथे एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. मानवी विकासाचे पैलू: बहुआयामी दृष्टिकोन हा परिषदेचा विषय होता या राष्ट्रीय परिषदेला पंजाब, कर्नाटक, गुजरात तसेच मुंबई, धुळे, अहिल्यानगर, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर आदी भागातून एकूण २३५ निबंध प्राप्त झाले. परिषदेस विविध महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक व संशोधक उपस्थित होते.

इतिहास विभागाद्वारे इतिहास अभ्यास मंडळाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आलेत. यामध्ये अतिथींचे व्याख्यान, प्रश्नमंजुषा, सेमिनार आणि समूहचर्चा आयोजित करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास कसा साधला जाईल याबाबत प्रयत्न करण्यात आले.
सांस्कृतिक विभागाद्वारे सामूहिक नृत्य स्पर्धा, एकल नृत्य स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, एकांकिका तसेच वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास साधला गेला.

गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे पोषण मास , प्रथिनेयुक्त नाविन्यपूर्ण पदार्थ बनविणे, आरोग्य तपासणी, पोषण विषयक मार्गदर्शन ,अभ्यास मंडळाची स्थापना आणि पार्ले बिस्कीट फॅक्टरी भेट आदी उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य विषयक, व्यवसाय विषयक जागृती करण्यात आली.

राज्यशास्त्र विभागाद्वारे अभ्यास मंडळ स्थापना करून त्यामाध्यमातून एड्स जनजागृती अभियान वंदे मातरम, सामूहिक गान महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, स्वातंत्र्य दिनानिमित्त तिरंगा रॅली इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आंतरराष्ट्रीय योग दिवस, तिरंगा रॅली, शिक्षक दिवस, राष्ट्रीय सेवा योजना दिवस, वृक्षारोपण आणि वितरण वंदे मातरम गान,संविधान दिवस, महापरिनिर्वाण दिवस, राष्ट्रीय युवा दिन, एड्स जनजागरण, शिवाजी महाराज जयंती, संत गाडगेबाबा जयंती तसेच दत्तक गावामध्ये निवासी श्रम संस्कार शिबिर अशा प्रकारचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

समाजशास्त्र विभागा कडून अभ्यास मंडळाची निर्मिती करून त्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा आदर्श ,आदिवासी समाजातील, युवा गृह पद्धती अशा महत्वपूर्ण विषयावर विद्यार्थ्यांचा सेमिनार आयोजित करून विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सामाजिक बांधिलकीची विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक होण्याच्या दृष्टीने सांगली,सातारा ,लातूर येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत फेरीचे आयोजन करून उपविभागीय अधिकारी खामगाव यांच्याकडे ६००० रुपये योगदान सुपूर्द करण्यात आले.

क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी क्रॉस कंट्री ,मैदान स्पर्धा, कबड्डी ( मुले –मुली) खो–खो (मुले ) तलवारबाजी या खेळामध्ये सहभाग नोंदविला. आंतरमहाविद्यालयीन तलवारबाजी क्रीडा स्पर्धेमध्ये धवल साखरकर या विद्यार्थ्याने कांस्यपदक प्राप्त करून महाविद्यालयाच्या लौकिकात भर घातली.

इंग्रजी विभागातर्फे अभ्यास मंडळाचे उद्घाटन दिनांक १ आक्टोंबर २०२५ आंतरराष्ट्रीय भाषांतर दिवसावर करण्यात आले त्याप्रसंगी प्रश्नमंजुषा स्पर्धा ऑनलाइन आयोजित करण्यात आली होती. तसेच विल्यम शेक्सपियर यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाइन प्रश्नमंजुषा तयार करण्यात आलेली होती तरी  विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला

डॉ. संजय पाटील
प्राचार्य,
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे
कला महाविद्यालय, खामगांव.



आरोग्य व पोषण विषयक मार्गदर्शन आणि गृह अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन.

ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाव्दारे आयोजित ग्रंथप्रदर्शनीचे अवलोकन करतांना मान्यवर.







दत्तग्राम मांडका येथे रा.से.यो. च्या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये हळदी – कुंकू कार्यक्रमाचे आयोजन

ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाव्दारे आयोजित शैक्षणिक सहल







गृहअर्थशास्त्र विभागातर्फे हस्तकला वस्तुंच्या प्रदर्शनीला भेट

अंतरराष्ट्रीय योग दिवस






प्रथिनेयुक्त
नाविन्यपूर्ण
खाद्यपदार्थ स्पर्धा

सांगली, सातारा, लातुर येथील पुरग्रस्त शेतकऱ्यांसाठी समाजशास्त्र विभागाव्दारे मदत फेरी काढण्यात आली.







वार्षिक स्नेह संमेलनामध्ये
नृत्य सादर करतांना
महाविद्यालयीन
विद्यार्थिनी

# मराठी विभाग

लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म , पंथ , जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

**सुरेश भट**

# कृत्रिम बुद्धिमत्ता AI

## मानवाला मिळालेले वरदान

आजचे जग वेगाने बदलत आहे आणि या बदलामागे आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही एक अतिशय महत्त्वाची शक्ती आहे म्हणजे अशी बुद्धिमान संगणक प्रणाली जी माणसासारखे विचार करू शकते शिकू शकते आणि निर्णय घेऊ शकते शिक्षण क्षेत्रात यामुळे क्रांतिकारी बदल होत असून भविष्यातील शैक्षणिक जग पूर्णपणे वेगळे आणि अधिक प्रभावी होणार आहे. पूर्वी शिक्षण हे फक्त वर्ग खोलीपुरते मर्यादित होते शिक्षण फड्यावर शिकवत आणि विद्यार्थी वहीत लिहीत पण आज यामुळे शिक्षण डिजिटल वैयक्तिक पर्सनलाईज आणि स्मार्ट झाले आहे. स्मार्ट बोर्ड, ऑनलाइन क्लासेस, ई – लर्निंग ॲप्स, वर्चुअल क्लासरूम्स हे सर्व याचेच परिणाम आहेत. त्यामुळे विद्यार्थी कुठेही आणि कधीही शिकू शकतात. सर्वात मोठा फायदा म्हणजे वैयक्तिक शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यांची शिक्षणाची गती वेगळी असते. काही विद्यार्थ्यांना पटकन समजतात तर काहींना वेळ लागतो. या आधारित ॲप्स आणि सॉफ्टवेअर विद्यार्थ्यांची क्षमता ओळखून त्यानुसार अभ्यासक्रम सुचवतात ज्याला गणित अवघड वाटते त्याला जास्त सराव दिला जातो आणि तो विषय सोपा वाटतो तो पुढच्या स्तरावर नेला जातो त्यामुळे विद्यार्थी तणाव मुक्तपणे वेगळे आणि अधिक प्रभावी होणार आहे भविष्यात ए. आय. शिक्षकांचा सहकारी बनेल ए. आय. शिक्षकांची जागा घेणार नाही तर त्यांना मदत करेल उपस्थिती नोंद परीक्षेचे मूल्यमापन प्रगती अहवाल तयार करणे अशी कामे यशवंत करू शकतो. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांवर अधिक लक्ष देता येईल शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होईल. यामुळे ऑनलाईन शिक्षण अधिक लोकप्रिय झाले आहे. व्हिडिओ लेक्चर्स, ट्यूटर, चॅटबॉक्स यामुळे विद्यार्थ्यांचे शंका लगेच दूर होतात. ग्रामीण आणि दुसऱ्या भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण मिळू शकते, त्यामुळे शिक्षणातील असमानता कमी होण्यास मदत होईल.

परीक्षा पद्धतीतही ए.आय. मोठा बदल घडवून आणेल. भविष्यात फक्त पाठांतरावर आधारित परीक्षा न होता कौशल्य आणि विचारशक्ती यावर भर दिला जाईल. या विद्यार्थ्यांच्या उत्तरांचे विश्लेषण करून त्यांची खरी समाज तपासू शकते. तसेच यामुळे करिअर मार्गदर्शन अधिक अचूक होईल विद्यार्थ्यांची आवड क्षमता आणि कामगिरी पाहून या योग्य करिअर पर्याय सुचवेल त्यामुळे चुकीचे निर्णय टळतील आणि विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होईल.

तरी ए.आय. वापर करताना काही आव्हाने आहेत तंत्रज्ञानावर अतिशय अवलंबून राहणे डेटा सुरक्षेचा प्रश्न आणि मानवी मूल्य जपण्याची गरज ही आव्हाने महत्त्वाचे आहेत. म्हणूनच ए.आय. वापर जबाबदारीने आणि संतुलित पद्धतीने करणे आवश्यक आहे. शेवटी असे म्हणता येईल की, ए. आय. आणि शिक्षण याचा संगणक भविष्यातील शैक्षणिक जगाला अधिक प्रगत समावेशक आणि प्रभावी बनवेल योग्य मार्गदर्शन मानवी स्पर्श आणि तंत्रज्ञान यांचा समतोल राखला तर याही शिक्षण क्षेत्रासाठी वरदान ठरेल भविष्यातील शिक्षण अधिक स्मार्ट सुलभ आणि विद्यार्थी केंद्रित असेल आणि त्यामागे याची महत्त्वाची भूमिका असेल.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा इतिहास आणि विकास :**

कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना १९५० च्या दशकात पुढे आली ब्रिटिश गणितं तज्ञ अलन प्युरिंग यांनी पहिल्यांदा विचार मांडला की संगणक विचार करू शकतो का यावर त्यांनी टुरिंग चाचणी तयार केली ज्याच्या मदतीने मशीन मानवी मेंदू सारखी बुद्धिमत्ता दाखवू शकतो का? हे तपासले गेले १९९५ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता हा शब्द प्रथम वापरला आणि या क्षेत्राला अधिकृत अभ्यास सुरू झाला त्यानंतर संगणकीय शक्ती वाढत गेली. अनेक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संशोधनात मोठी प्रगती झाली. आज ए.आय. मोठ्या प्रमाणावर क्रांती विकसित झाले असून ते वैद्यकीय क्षेत्र, औद्योगिक स्वयंचलन, रोबोटिक्स, डेटा विश्लेषण, वित्तीय सेवा, वाहतूक आणि शिक्षण क्षेत्रात मोठी क्रांती घडवत आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्तेची वैशिष्ट्ये स्वयं अभ्यास क्षमता :**

– या प्रणाली अनुभवातून शिकते आणि स्वत:मध्ये सुधारणा करते.

– स्वयंचलित निर्णय क्षमता : संगणक मोठ्या प्रमाणावर माहितीचे विश्लेषण करून झपाट्याने निर्णय घेऊ शकतो.

– डेटा विश्लेषण : मोठ्या प्रमाणात डेटा संकलित करून त्यावर प्रक्रिया करते आणि निर्णय घेते.

– मानवी संपादकाची क्षमता : ए.आय. आधारित चॅट बॉक्स व्हर्चुअल असिस्टंट ( Google assistant, Siri, Alexa) माणसासारखा संपाद साधतात.
– स्वयंचलित यंत्रे : यामुळे कारखान्यातील उत्पादन स्वयंचलित झाले आहे, ज्यामुळे वेळ आणि श्रम वाचतात.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे विविध उपयोग :
**वैद्यकीय क्षेत्र** : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने रोगनिदान अधिक प्रभावी झाले असून कॅन्सर, हृदयरोग यांसारख्या गंभीर आजारांचे लवकर आणि अचूक निदान करता येते तसेच रोबोटिक सर्जरीमुळे अत्यंत अचूकतेने आणि कमी जोखमीनें शस्त्रक्रिया करणे शक्य होते. याशिवाय स्वयंचलित आरोग्य सल्ला या हेल्थ असिस्टंट देणारे आधारित अ‍ॅप्स रुग्णांना घरबसल्या वैद्यकीय मार्गदर्शन आणि सल्ला देतात. ज्यामुळे आरोग्यसेवा अधिक सुलभ आणि वेगवान बनली आहे.

**शिक्षण क्षेत्र** : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने ऑनलाईन शिक्षण अधिक प्रभावी झाले आहे. कारण ए.आय. वैयक्तिक शिक्षणक्रम तयार करण्यास मदत करते. याशिवाय स्वयंचलित मूल्यमापन प्रणाली परीक्षांचे मूल्यमापन जलद आणि अचूकपणे करू शकते तसेच आभासी शिक्षण म्हणजे व्हर्च्यूअल टीचर्स विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत असून ते त्यांच्या शिक्षणाच्या प्रक्रियेत मदत करतात.

**वाहतूक आणि स्वयंचलित वाहने** : ए.आय.च्या मदतीने स्वयंचलित कार म्हणजे ऑटोनॉमस कार्स विकसित केल्या जात असून टेसला आणि गुगल सारख्या कंपन्या सेल्फ ड्रायव्हिंग कार तयार करत आहेत. याशिवाय ट्रॅफिक व्यवस्थापन प्रणाली ए.आय.च्या साहायाने वाहतूक अधिक प्रभावीपणे नियंत्रण करते त्यामुळे अपघात आणि ट्रॅफिक जाम अधिक होण्यास मदत होते.

बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र याच्या मदतीने ऑनलाईन बँकिंग सुरक्षित व्यवहार आणि गुंतवणुकीसाठी अचूक सल्ला दिला जातो. तसेच फसवणूक शोधणे म्हणजे फ्रॉड डिटेक्शन आणि रोखणे अधिक सोपे झाले असून आर्थिक व्यवहार अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनले आहेत, मनोरंजन आणि मीडिया ए.आय.चा उपयोग व्हिडिओ गेम्स चित्रपट निर्मिती आणि संगणक निर्मिती मोठ्या प्रमाणावर केला जातो, तसेच यु ट्युब सारख्या प्लॅटफॉर्मवर ए.आय. वापर करण्याच्या पसंतीनुसार सामग्रीचा स्वयंचलित शिफारस देते. त्यामुळे अनुभव अधिक वैयक्तिक आणि उपयुक्त ठरतो. कृत्रिम बुद्धिमत्तेची आव्हाने आणि तोटे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संगणक तंत्रामुळे अनेक आव्हाने आणि तोटे देखील निर्माण होत आहेत सर्वात मोठा धोका म्हणजे नोकऱ्यांवरील परिणाम कारण ऑटोमेशन मुळे उद्योगांमध्ये मनुष्यबळाची गरज कमी होत आहे. त्यामुळे अनेक पारंपरिक नोकऱ्या नष्ट होण्याची भीती आहे. याशिवाय गोपनीयता आणि सुरक्षा धोके यांचा समावेश होते. कारण या आधारित प्रणाली सायबर हल्ल्यांना बळी पडू शकतात आणि वैयक्तिक माहितीचा गैरवापर होण्याचा धोका निर्माण होतो. तसेच नैतिकता आणि जबाबदारी या दृष्टीने विचार केल्यास या चुकीच्या डेटावर आधारित निर्णय घेतल्यास मोठे नुकसान होऊ शकते, याशिवाय जर नियंत्रित यंत्रे आणि रोबोट मानवी नियंत्रणा बाहेर गेले तर त्यांच्या समाजावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा जबाब जबाबदारीने आणि योग्य नियमासह वापर करणे अत्यावश्यक आहे.

**भविष्यातील शक्यता आणि निष्कर्ष** : कृत्रिम बुद्धिमत्ता ही आधुनिक जगासाठी मोठी क्रांती आहे. यामुळे मानवी जीवन अधिक समृद्ध सुरक्षित आणि सोपे झाले आहे. मात्र त्यांच्या योग्य वापरासाठी नैतिकता सुरक्षा आणि मानवी हक्काचे संरक्षण करणे आवश्यक आहे. भविष्यात हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनेल. परंतु यावर योग्य नियंत्रण ठेवणे ही आपली जबाबदारी आहे.

**सलोनी रमेश सदार**

**B.A. III**



# कृत्रिम बुद्धिमत्ता विविध उपयोग आणि तोटे

आधुनिक युगातील क्रांती :
तंत्रज्ञानाच्या प्रगतीने माणसाचे जीवनात मोठे बदल घडवले आहेत. संगणक, इंटरनेट सारखे मोबाईल आणि डिजिटल प्रणाली यामुळे मानवी जीवन अधिक सुलभ झाले आहे. या तंत्रज्ञानाच्या प्रवासात कृत्रिम बुद्धिमत्ता ही आधुनिक आर्टिफिशियल इंटेलिजन्स : जगासाठी एक क्रांतिकारी संकल्पना ठरली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक प्रणालीला मानवी बुद्धिमत्ते सारखे विचार करणं शिकवण्यास आणि निर्णय घेण्यास सक्षम बनवणारी प्रणाली, यामध्ये मशीन लर्निंग, डीप लर्निंग, न्यूरल नेटवर्क आणि नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग यांचा मोठा वाटा आहे. आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक क्षेत्रांमध्ये उपयोगी ठरत असून ते आपली जीवनशैली बदलत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा इतिहास आणि विकास :
कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना १९५० चे दशकात पुढे आली. ब्रिटिश गणिततज्ञ अलन टयुरींग यांनी पहिल्यांदा विचार मांडला की संगणक विचार करू शकतो का ? यावर त्यांनी चाचणी तयार केली त्याच्या मदतीने मशीन मानवी मेंदू सारखी बुद्धिमत्ता दाखवू शकते का हे तपासले गेले. १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता हा शब्द प्रथम वापरला आणि त्या क्षेत्रांच्या अधिकृत अभ्यास सुरू झाला. त्यानंतर संगणकीय शक्ती वाढत गेली आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संशोधनात मोठी प्रगती झाली आज ए.आय. मोठ्या प्रमाणावर विकसित झाले असून ते वैद्यकीय क्षेत्र, औद्योगिक स्वयंचलन, रोबोटिक्स डेटा विश्लेषण, वित्तीय सेवा, वाहतूक आणि शिक्षण क्षेत्रात मोठी क्रांती घडवत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेची वैशिष्ट्ये :
**स्वयं अभ्यास क्षमता :**
या प्रणाली अनुभवातून शिकते आणि स्वत:मध्ये सुधारणा करते
**स्वयंचलित निर्णय क्षमता :**
संगणक मोठ्या प्रमाणावर माहितीचे विश्लेषण करून झपाट्याने निर्णय घेऊ शकते
**डेटा विश्लेषण :**
या मोठ्या प्रमाणात डेटा संकलित करून त्यावर प्रक्रिया करते आणि निर्णय घेते
**मानवी संवादाची क्षमता :**
ए.आय. आधारित चॅट बॉक्स व्हर्चूअल असिस्टंट गुगल (गुगल असिस्टंट, सिरी, अ‍ॅलेक्सा) माणसासारखा संवाद साधतात.
**स्वयंचलित यंत्रे :**
यामुळे कारखान्यातील उत्पादन स्वयंचलित झाले आहे. ज्यामुळे वेळ आणि श्रम वाचतात.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचे विविध उपयोग**
**वैद्यकीय क्षेत्र :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने रोगनिदान अधिक प्रभावी झाले असून कॅन्सर, हृदयरोग यांसारख्या गंभीर आजारांचे लवकर आणि अचूक निदान करता येते. तसेच रोबोटिकमुळे अत्यंत अचूकतेने आणि कमी जोखमीने शस्त्रक्रिया करणे शक्य होते. याशिवाय स्वयंचलित आरोग्य सल्ला देणारे ए.आय. वर आधारित आज रुग्णांना घरबसल्या वैद्यकीय मार्गदर्शन आणि सल्ला देतात. यामुळे आरोग्यसेवा अधिक सुलभाने वेगवान बनली आहे.

**शिक्षण क्षेत्र :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने ऑनलाईन शिक्षण अधिक प्रभावी झाले आहे. कारण ए.आय. वैयक्तिक शिक्षण क्रम तयार करण्यास मदत करते. याशिवाय स्वयंचलित मूल्यमापन प्रणाली परीक्षांचे मूल्यमापन जलद आणि अचूकपणे करू शकते. तसेच आभासी शिक्षण व्हर्चूअल टीचर्स विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत असून ते त्यांचे शिकण्याचा प्रक्रियेत मदत करतात.

**वाहतूक आणि स्वयंचलित वाहने :** ए.आय. च्या मदतीने स्वयंचलित कार ऑटोनॉमस कार विकसित केल्या जात असून टेस्ला आणि गुगल

यांसारख्या कंपन्या सेल्फ ड्रायव्हिंग कार तयार करत आहेत. याशिवाय ट्रॅफिक व्यवस्थापन प्रणाली ए.आय. च्या साहाय्याने वाहतूक अधिक प्रभावीपणे नियंत्रित करते. ज्यामुळे अपघात आणि ट्रॅफिक जाम कमी होण्यास मदत होते.

**बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र :**

ए.आय. च्या मदतीने ऑनलाईन बँकिंग सुरक्षित व्यवहार आणि गुंतवणुकीसाठी अचूक सल्ला दिला जातो. तसेच फसवणूक शोधणे, फ्रॉड डिटेक्शन आणि रोखणे अधिक सोपे झाले असून, आर्थिक व्यवहार अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनले आहे.

**मनोरंजन आणि मीडिया :**

ए.आय. च्या उपयोग व्हिडिओ गेम, चित्रपट निर्मिती आणि संगीत निर्मितीत मोठ्या प्रमाणावर केला जातो. तसेच नेटफ्लिक्स आणि युट्यूब यांसारख्या प्लॅटफॉर्मवर या वापरकर्त्यांच्या पसंतीनुसार सामग्रीची स्वयंचलित शिफारस देते. त्यामुळे अनुभव अधिक वैयक्तिक आणि उपयुक्त ठरतो. कृत्रिम बुद्धिमत्तेची आव्हाने आणि तोटे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे अनेक आव्हाने आणि तोटे देखील निर्माण होत आहेत. सर्वात मोठे धोका म्हणजे नोकऱ्यांवरील परिणाम कारण ऑटोमेशन उद्योगांमध्ये मनुष्यबळाची गरज कमी होते आहे. त्यामुळे अनेक पारंपारिक नोकऱ्या नष्ट होण्याची भीती आहे. याशिवाय गोपनीयता आणि सुरक्षा धोके यांचा समावेश होतो. कारण ए.आय. वर आधारित प्रणाली सायबर हल्ल्यांना बळी पडू शकतात आणि वैयक्तिक माहितीचा गैरवापर होण्याचा धोका निर्माण होतो. तसेच नैतिकता आणि जबाबदारी या दृष्टीने विचार केल्यास या चुकीच्या डेटावर आधारित निर्णय घेतल्यास मोठे नुकसान होऊ शकते. याशिवाय जर नियंत्रित यंत्रे आणि रोबोट मानवी नियंत्रणा बाहेर गेले तर त्याचा समाजावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा जबाबदारीने आणि योग्य नियमासह वापर करणे अत्यावश्यक आहे.

**भविष्यातील शक्यता आणि निष्कर्ष**

कृत्रिम बुद्धिमत्ता ही आधुनिक जगासाठी मोठी क्रांती आहे. यामुळे मानवी जीवन अधिक समृद्ध, सुरक्षित आणि सोपे झाले आहे. मात्र त्याच्या योग्य वापरासाठी नैतिकता सुरक्षा आणि मानवी हक्काचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे. भविष्यात हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनेल. परंतु त्याच्यावर योग्य नियंत्रण ठेवणे ही आपली जबाबदारी आहे.

## *कृत्रिम बुद्धिमत्ता आपला नवा साथीदार*

मनाची बुद्धी अपार
विज्ञानाचा झाला विस्तार ।
संगणकातून जन्म घेतला
ए.आय. साथी नव्या युगाला ।।

विचार करतो, शिकतो नवा
यंत्र झाला आता सखा खरा ।
मानव जसा निर्णय घेतो
तसाच मशीनही विचार करतो ।।

शिक्षण क्षेत्री दिली मदत
विद्यार्थ्यांना मिळाली साथ ।
प्रश्न विचारला त्वरित उत्तर
ज्ञानसागर झाला अपार ।।

शेतीतही केला चमत्कार
हवामानाचा देतो इशारा ।
पिकांवरती रोग ओळखतो
शेतकऱ्यांचा दुःखात उभा राहतो ।।

वाहतुकीत गाड्या धावतात
स्मार्ट सिग्नल रस्ता सांभाळतात ।
जीपीएस ने दिशा दाखवते
प्रवास सोपा सुखात बनवतो ।।

बँकिंग मध्ये सुरक्षितता
सोशल मीडियात नवीन जवळीकता ।
जगातील सारे जोडले जाते
ए.आयमुळे अंतर मिटले ।।

पण काही धोकेही लपलेले
बेरोजगाराची सावट दाटलेली ।
मानव झाला जर आळशी फार
तर भविष्य होईल अंधार ।।

भावना नाहीत यंत्रांमध्ये
नैतिक मूल्य नसतात त्यामध्ये ।
म्हणूनच वापर करावा जपून
मानवतेला नेहमी ठेवावे स्मरून ।।

योग्य मार्गाने दिली साथ
ए.आय. बनेल जीवनसाथ ।
विज्ञानाची ही अद्भुत देणगी
मानवाच्या आजची खरी जाणीव ।।

तरी करू नको अतिरेकी वापर
माणुसकी हरवून नाही हेच उपकार ।
योग्य मार्गाने नेते जर साथ
यावरील खरा मित्र जीवन सर ।।

**काजल राम क्षिरसागर**
**BA III**



# गावामध्ये बदल घडविणारे ए.आय.

काही वर्षांपूर्वीपर्यंत आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे फक्त मोठ्या शहरांमधील संगणक किंवा रोबोटची संबंधित तंत्रज्ञान असे अनेकांना वाटत होती. पण आज परिस्थिती बदलत आहे आणि बदलली आहे. आता हळूहळू गाव, शेत आणि ग्रामीण जीवनातही पोहोचू लागले आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये शेतकरी, विद्यार्थी आणि शिक्षक ए.आय.च्या मदतीने नवीन मार्ग शोधत आहेत. ज्यामुळे गावातील जीवन अधिक स्मार्ट आणि सोयीचे बनत आहेत.

शेतीत स्मार्ट ए.आय. मदत कशी होते. महाराष्ट्र हे शेतीप्रधान राज्य आहे राज्यातील जवळपास ५५ ते ६० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. पाऊस कधी येईल ? पिकांवर रोग येईल का ? किंवा खत किती द्यावे ? या गोष्टी शेतकऱ्यांसाठी नेहमीच मोठा प्रश्न असतात. आज ए.आय. च्या मदतीने या प्रश्नांची उत्तरे मिळू लागली आहेत. उदाहरणार्थ महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मायक्रोसॉफ्ट आणि इंटरनॅशनल कप रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर द सेमी ट्राफिक यांच्या सहकार्याने या आधारित शेती प्रकल्प राबविले गेले आहेत. या प्रकल्पात शेतकऱ्यांना मोबाईलवर संदेश पाठवून पेरणीची योग्य वेळ, पाण्याच्या नियोजन आणि खत व्यवस्थापन याबद्दल मार्गदर्शन केले जाते. अभ्यासानुसार काही ठिकाणी उत्पादनात १५ ते २०% वाढ झाल्याने दिसून आले आहे आणि ही खूप महत्त्वाची नोंद आहे.

हवामान अंदाज आणि शेतकऱ्यांची तयारी पाऊस हा शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आज ए.आय. आणि उपग्रहाच्या मदतीने हवामानाचा अंदाज अधिक अचूक होत आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रोच्या उपग्रहाद्वारे हवामान आणि जमिनीची माहिति गोळा करते. ही माहिती ए.आय.च्या मदतीने विश्लेषित केली जाते आणि त्यातून पावसाचा अंदाज दुष्काळाची शक्यता किंवा परिस्थिती याबद्दल माहिती मिळतील. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक तयारी करता येते.

**विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी :**
आजचे विद्यार्थी हे उद्याचे वैज्ञानिक अभियंते आणि संशोधक आहेत. तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या संगणक आणि विज्ञान यामध्ये रस घेतला तर ते भविष्यात गावासाठी नवीन तंत्रज्ञान तयार करू शकतात. कदाचित उद्या एखादा विद्यार्थी गावासाठी स्मार्ट शेती पावसाचा अचूक अंदाज देणारी प्रणाली किंवा शिक्षणासाठी ए.आय. आधारित साधन तयार करेल. गाव, शेती आणि शिक्षण यांना तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर ग्रामीण भारताचा चेहरा मोहरा बदलू शकतो आणि फक्त शहरासाठी नाही तर ती गावाच्या विकासासाठी मोठी संधी आहे. योग्य शिक्षण, जिज्ञासा आणि प्रयोगशील वृत्ती असेल तर ग्रामीण भागातील विद्यार्थी या नव्या तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करू शकतात.

**विद्यार्थ्यांसाठी डिजिटल शिक्षण आणि भूमिका :**
ग्रामीण भागाचे विद्यार्थ्यांसाठी एक मोठी संधी निर्माण करत आहे. महाराष्ट्र जिल्हा अनेक शाळांमध्ये आता डिजिटल क्लासरूम आणि ऑनलाईन शिक्षण सुरू झाले आहेत. काही शैक्षणिक ॲप्स याच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची पद्धत समजून घेतात आणि त्यानुसार प्रश्न, सराव आणि व्हिडिओ देतात. त्यामुळे विद्यार्थी स्वतःच्या गतीने शिकू शकतात. आज ग्रामीण भारतातील सुमारे ४० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थी मोबाईल किंवा इंटरनेटच्या माध्यमातून डिजिटल शिक्षणाचा वापर करत आहेत.

**गावातील आरोग्य आणि इतर सेवा :**
ए.आय.चा उपयोग ग्रामीण आरोग्य सेवेतही होत आहे. काही ठिकाणी मोबाईल ॲपच्या मदतीने रोगांचे प्राथमिक निदान केले जाते आरोग्य कार्यकर्ते मोबाईलद्वारे माहिती पाठवतात आणि डॉक्टर दूरवरून सल्ला देऊ शकतात. त्यामुळे डॉक्टर कमी असलेल्या भागांमध्येही उत्तम आरोग्य सेवा मिळू शकते.

**कांचन प्रकाश वाकोडे**
**BA II**

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाज

मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आजवर
अनेक शोध लावले, पण
कृत्रिम बुद्धिमत्ता ए.आय. हा असा शोध आहे
जो मानवासारखाच विचार करू लागला आहे.

आजच्या २१ व्या शतकात आपण एका अशा युगात जगत आहोत. तिथे तंत्रज्ञान आपल्या अविभाज्य भाग बनलेला आहे. यात सर्वात महत्त्वाची आणि चर्चेत असलेली गोष्ट म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स सोप्या भाषेत सांगायचे तर जेव्हा एखाद्या मशीन किंवा संगणक मानवाप्रमाणे विचार करू लागते, शिकते आणि निर्णय घेते तेव्हा त्याला कृत्रिम बुद्धिमत्ता असे म्हणतात. आजच्या जगात ए.आय. केवळ एका सॉफ्टवेअरचे नाव राहिलेले नाही, तर ती एक अशी क्रांती आहे. जिने संपूर्ण समाजाचा चेहरा मोहरा बदलून टाकला आहे.

ए.आय.चे स्वरूप आणि व्याप्ती कृत्रिम बुद्धिमत्ता : म्हणजे संगणकाला दिलेली चुकांमधून अशी शक्ती याद्वारे तो स्वतःहून निर्णय घेऊ शकतो चुकांमधून शिकू शकतो आणि क्लिष्ट समस्या सोडवू शकतो. आपल्या हातातील छोट्याशा स्मार्टफोनमधील सिरी किंवा गुगल असिस्टंट पासून ते स्वतः चालणाऱ्या ड्रायव्हरलेस कारपर्यंत ए.आय.चा संचार आहे. वैद्यकीय क्षेत्र डॉक्टरांच्या आधी कर्करोगाचे निदान करणे असो किंवा अंतराळातील गुपित उलगडणे यांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे.

समाजावर होणारा सकारात्मक परिणाम : यामुळे मानवी जीवन अधिक सुसह्य आणि वेगवान झाले आहे. शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्याला शिकवणारे पर्सनलाईज्ड टयुटर्स उपलब्ध झाले आहेत. शेतीमध्ये हवामानाचा अचूक अंदाज वर्तवून शेतकऱ्यांचे नुकसान टाळले जात आहे. उद्योगांमध्ये उत्पादनाचा वेग वाढला असून मानवी चुकांचे प्रमाण कमी झाले आहेत. थोडक्यात सांगायचे तर ज्या कामाला तासनतास लागायचे ते कामे आता काही सेकंदात पूर्ण होतात.

नैतिक आव्हाने आणि भीती : पण प्रत्येक मोठ्या बदलासोबत काही भीती येते यामुळे अनेक पारंपारिक नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत, अशी भीती समाजात पसरली आहे. डीप फेक सारख्या तंत्रज्ञानामुळे खोट्या बातम्या आणि अफवा पसरवणे सोपे झाले आहे. जे सामाजिक आरोग्यासाठी घातक आहे. सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, जर यंत्रे मानवासारखा विचार करू लागली तर मानवी संवेदनशीलता, प्रेम आणि नैतिकता यांचे काय होणार ? यंत्राला बुद्धी असू शकते पण त्याला हृदय नसते. यंत्राला मेंदू देता येतो पण हृदय नाही आणि बुद्धी देता येते पण संस्कार नाही.

आजच्या २१ व्या शतकात मानवाने विज्ञानाच्या जोरावर एक असं विश्व निर्माण केलं आहे. जिथे यंत्र केवळ माणसाच्या आज्ञा पाळत नाहीत तर ती माणसासारख्या विचारही करू लागली आहे. याच क्रांतीला आपण आर्टिफिशियल इंटेलिजन्स शेवटी हे एक साधन आहे साध्य नाही, यंत्राला कितीही बुद्धी दिली तरी मानवी संवेदनशीलता, प्रेम आणि नीतीमत्ता याची जागा कोणताही सॉफ्टवेअर घेऊ शकणार नाही. आपण तंत्रज्ञानाचे गुलाम न होता त्याचे स्वामी बनवुन जर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला तर हे जग अधिक सुंदर आणि प्रगत होईल, विज्ञानाचा हा प्रकाश मानवाच्या कल्याणासाठीच वापरला जावा हीच काळाची गरज आहे.

निष्कर्ष : शेवटी ए.आय. हे एक साधन आहे सध्या नाही ते मानवाचा पर्याय कधी बनूच शकत नाही. कारण सृजनशीलता आणि भावना ही निसर्गाची केवळ मानवाला दिलेली देणगी आहे. आपण याकडे एक स्पर्धा म्हणून न बघता एक सहकारी म्हणून बघितले पाहिजे. जर आपण या तंत्रज्ञानाचा वापर नैतिकतेच्या चौकटीत राहून केला तर येणारा काळ हा नक्कीच उज्वल असेल, यंत्राला बुद्धी द्या पण माणसाने आपली सद्विवेकबुध्दी हरवू नये. यातच मानवाचे कल्याण आहे.

**योगिता शिवाजी गायकवाड**
**B.A. I**



# कृत्रिम बुद्धिमत्ता विविध फायदे व तोटे

कृत्रिम बुद्धिमत्ता उद्योगांमध्ये परिवर्तन घडवित आहे. पारंपरिक भूमिकांना बाजूला ठेवून या लोकांसाठी नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करत आहेत. ए.आय. बद्दल शिकल्याने समस्या सोडवण्याची कौशल्य विकसित होतात. कृत्रिम बुद्धिमत्ता ही दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. या सर्व कारणांमुळे विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स बद्दल माहिती असणे आवश्यक आहे.

डिजिटल उपकरणे आणि वेगवान इंटरनेटमुळे कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या जीवनाच्या एक महत्त्वाच्या भाग बनले आहे. सरकार पासून ते व्यवसायापर्यंत सर्व क्षेत्रातील लोक समस्या सोडविण्यासाठी आणि प्रक्रिया सुधारण्यासाठी ए.आय.चा वापर वाढत्या प्रमाणात करत आहेत. भविष्यात ए.आय. लोकांचे जीवन खूप सोपे करेल. परंतु त्यांचे काही नकारात्मक परिणाम देखील आहेत. जे विचारात घेतले पाहिजे. याचा वापर मर्यादित प्रमाणात केला पाहिजे आणि त्यावर पूर्णपणे अवलंबून राहू नये. मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या तंत्रिक नऊ उपक्रमांमध्ये ए.आय. आघाडीवर आहे. त्यांचे अनुप्रयोग, आरोग्यसेवा आणि शिक्षणापासून ते वित्त आणि वाहतूक अशा उपयोगांमध्ये पसरलेले आहेत. जे जटील समस्यांवर उपाय देतात आणि कोणतेही कार्य सुधारतात.

**कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय ?**
आर्टिफीशियल इंटेलिजन्स ही एक प्रकारचे तंत्रज्ञान आहे. जी संगणक आणि यंत्रणा मानवाप्रमाणे विचार करण्यास आणि शिकण्यात मदत करते. कृत्रिम बुद्धिमत्ता संगणकांना काही कामे करण्यास मदत करते. कृत्रिम बुद्धिमत्ता ज्यांना सहसा मानवी बुद्धिमत्तेची आवश्यकता असते, जसे की वेगवेगळ्या लिखित भाषा समजून घेणे चित्रांमधील नमुने ओळखणे तार्कीक आणि गंभीर समस्या सोडवणे आणि निर्णय घेणे आपल्या फोनमधील ए.आय. आपल्या माणसाप्रमाणे सिरी किंवा एलेक्सासारख्या व्हर्चूअल असिस्टंट ची बोलण्याची परवानगी देते हे आपल्या इच्छा नुसार फोनमध्ये देखील काम करतात. डॉक्टरांना रोगांचे निदान करण्यास देखील मदत करू शकते. ए.आय. कार्य स्वयंचलित करून आणि स्मार्ट उपाय प्रदान करून आपले जीवन सोपे करत आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रकार :**
आपण कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रामुख्याने सात प्रकार मध्ये विभाजन करू शकतो.

१) **अरुंद ए.आय.** : हे ए.आय.विशिष्ट कार्य करण्यासाठी डिझाईन केलेले आणि प्रशिक्षित केलेले आहे. सिरी आणि एलेक्सासारखे व्हर्च्युअल असिस्टंट हे नेटफ्लिक्स आणि ॲमेझॉन द्वारे वापरले जाणारे ए.आय. आहेत.

२) **सामान्य एआय :** यामध्ये मानवाप्रमाणे विविध कार्य समजून घेण्याची शिकण्याची आणि ज्ञान लागू करण्याची क्षमता असते.

३) **सुपर इंटेलिजंट ए.आय. आहे :** जी मानवी बुद्धिमत्तेपेक्षा जास्त आहे आणि मानवी क्षमतेपेक्षा जास्त कामे करू शकते. हे ए.आय. एक काल्पनिक रूप आहे. हे असे असेल जे प्रत्येक क्षेत्रात मानवापेक्षा अधिक सक्षम असेल.

४) **रिॲक्टीव्ह मशीन्स :** अशी ए.आय.सिस्टीम आहे, जी भूतकाळातील घटनांची आठवण न ठेवता फक्त वर्तमान परिस्थितीवर प्रतिक्रिया देऊ शकतात. आयबीएम च्या डीप ब्लू प्रमाणे बुद्धिबळ खेळणारा ए.आय. संगणक

५) **लिमिटेड मेमरी :** ए.आय. सिस्टम वर्तमान निर्णयांची माहिती देण्यासाठी भूतकाळातील अनुभवांचा वापर करतात व ड्रायव्हिंग कार या इतर कारच्या वेगाचे आणि दिशांचे निरीक्षण करून चांगले ड्रायव्हिंग निर्णय घेतात.

६) **थेअरी ऑफ माईंड :** ही प्रणाली मानवी भावना श्रद्धा हेतू समजून घेतात आणि सामाजिक रित्या संवाद साधू शकतात या प्रकारची हवा अद्याप संशोधनाच्या टप्प्यात आहे आणि अद्याप उपलब्ध नाही.

**सेल्फ अवेअर एआय :** या ए.आय. ची स्वत:ची जाणीव आत्मजागृती आणि समज आहे. ही ए.आय.ची काल्पनिक संकल्पना आहे आणि सध्या अस्तित्वात नाही.

**विद्यार्थ्यांच्या जीवनावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव :**
आर्टिफिशियल इंटेलिजन्स विद्यार्थी अनुभवांना वैयक्तिक करून आणि त्यांना आधार देऊन त्यांच्या जीवनात लक्षणीय सुधारणा करते. ए.आय. संचालित साधने वैयक्तिक गरजा नुसार अभ्यास तयार करण्यात मदत करतात. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सोईनुसार शिकण्यास मदत होते. ए.आय.चे व्हर्चुअल असिस्टंट आणि चॅट बॉक्स त्वरित समर्थन आणि शिकवणी देऊन मदत करतात. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक संसाधने सहजपणे उपलब्ध करून देण्यास आणि त्यांचे आयोजन करण्यास मदत करते. ज्यामुळे शिक्षण अधिक कार्यक्षम आणि प्रभावी बनते. यामुळे विद्यार्थी फक्त त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या सामग्रीवर लक्ष केंद्रित करतात.

**विविध क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचे उपयोग :**
कृत्रिम बुद्धिमत्तेचे विविध क्षेत्रात विविध उपयोग आहेत. आरोग्य सेवेतील ए.आय. रोगांचे निदान आणि उपचार योजनांमध्ये मदत करते. शिक्षणात ते शिकण्याचे अनुभव वाढवते आणि विद्यार्थ्यांना व्हर्चूअल टयुटोरींग देखील प्रदान करते. ग्राहक सेवा देखील वाढवते, भविष्यातील शक्यतांचे विश्लेषण करून व्यवसाय ऑपरेशन सुधारते ही हे कामाच्या ठिकाणी फसवणूक शोधते आणि व्यापार स्वयंचलित करते. या वाहतुकीत सेल्फ ड्रायव्हिंग कारला देखील सक्षम करते. मनोरंजनातील ए.आय.च्या भूमिकेमध्ये चित्रपट आणि संगीतासाठी शिफारस प्रणालींचा समावेश आहे. तर शेतीमध्ये ते शेती आणि पीक देखरेखी साठी मदत करते.

**कृत्रिम बुद्धिमत्ता चे फायदे आणि तोटे :**
सध्या सर्वत्र कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे नाव आपल्या कानावर सतत पडत आहे. मग या वर्तमानपत्रातल्या बातम्या असो किंवा टीव्हीवरचे स्पेशल रिपोर्ट सोशल मीडियावरची चर्चासत्र असो की मित्राबरोबर केलेल्या गप्पा कृत्रिम बुद्धिमत्ता तिचे फायदे तोटे त्यांच्या मनावर होणारा परिणाम हा साध्या जगात सर्वत्र सतत चर्चिला जाणारा विषय आहे. आणि त्यांचे कारणही तसेच आहे प्रत्येकाला मनातून हे नक्की कळाले आहे की या कृत्रिम बुद्धिमत्तेचा माणसाचा जीवनावर खूप मोठा परिणाम होणार आहे. काहींच्या मते तो अगदी चांगला असेल तर काहींच्या मते तो अत्यंत वाईट. पण काहीतरी परिणाम होणार याबद्दल मात्र कोणाचे दुमत नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे तोटे समजून घेण्यापूर्वी प्रथम आपण कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय हे पाहू.

या लेखात खालील गोष्टी अंतर्भूत आहेत.

**१) कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे आणि तोटे**

**कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे :** सध्या बहुतेक सर्व कंपन्या अंतर्गत कारभार सुरळीत चालवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत घेत आहेत असे म्हटले जाते की कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग या दोन गोष्टी ज्या कंपन्या शिकून घेणार नाही त्या टिकून राहणार नाहीत.

१) कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यामुळे मानवी चुका टाळल्या जातात. तसेच मानवाला असलेला धोकाही टाळता येतो. खरे तर चुका करणे हा मानवी स्वभाव आहे. चुकातूनच माणूस शिकतो. असेही तत्त्वज्ञानही काही जण सांगतात. परंतु जेव्हा या चुकांमुळे व्यक्तीला किंवा आस्थापनांना मोठा तोटा होतो किंवा फटका बसतो.

२) कधी कधी काही कामे कारणे मानवासाठी अवघड आणि धोकादायक असते. अशी कामे करताना माणसाला इजा किंवा उपाय होऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून अशी कामे आपण करू शकतो. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीत अशा कृत्रिम बुद्धिमत्ताधारी रोबोचा वापर करता येणे शक्य आहे.

३) मानवी श्रमाला मर्यादा आहे एक माणूस दिवसातून फार तर आठ तास काम करू शकतो, परंतु त्यानंतर तो थकतो, परंतु यंत्राचे तसे नाही

ती अहोरात्र काम करू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तयार केलेले चॅटबॉट्स हे दिवसाचे २४ तास आठवड्याचे सातही दिवस ग्राहकांना सेवा पुरवू शकतात. त्यामुळे कारखान्याची उत्पादन क्षमता वाढते.

**पूर्वग्रह विरहित निर्णय :**
बऱ्याचदा निर्णय घेताना माणसांच्या पूर्वग्रहाचा त्या निर्णयावर परिणाम होतो. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून घेतलेलं निर्णयांचे तसे नसते. कारण ते निर्णय काटेकोरपणे तयार केलेल्या अल्गोरिदम वरून घेतले जातात. त्यामुळे पूर्वग्रहाचा निर्णयांवर परिणाम होत नाही.

**वारंवार केली जाणारी कामे :**
जेव्हा एखादे काम वारंवार केले जाते तेव्हा ते काम माणसाला कंटाळवाणे वाटू शकते. अशी कंटाळवाणी कामे जर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने केली गेली तर माणूस अधिक सृजनात्मक कामे करू शकतो.

**खर्चात कपात :**
कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने कामे केल्यास खर्चात कपात होते. यंत्रे २४ तास काम करू शकतात. कामगारांच्या सहाय्याने करून घेतलेल्या कामांपेक्षा यंत्राच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने केलेली कामे निश्चितपणे कितीतरी पटीने सरस ठरतात.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचे तोटे :**
कृत्रिम बुद्धिमत्तेचे वरील फायदे पाहता असे वाटते की अगदी निर्बुध्द मनुष्यच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास नकार देईल. पण प्रत्यक्षात असे नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेचे अनेक तोटेही आहेत. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यापूर्वी त्यांचे तोटेही बारकाईने लक्षात घेतले पाहिजे.

१) सर्वात पहिले आणि सर्वात मोठा तोटा म्हणजे याचा विकास आणि अंमलबजावणी ही फार खर्चिक बाब आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून तुम्ही नक्की काय करणार आहात यावर खर्चाचा आकडा ठरतो. अर्थात एकदा कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून याची अंमलबजावणी सुरू झाली.

२) भावना आणि सृजन शिलतेचा अभाव : मानव त्यांच्या भावना आणि सृजन शीलता वापरून निर्णय घेऊ शकतो. परंतु कृत्रिम बुद्धिमत्तेचे तसे नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून आपण चांगल्या संकल्पना मिळू शकतो. पण या मूळ किंवा ओरिजिनल नसतात.

३) यंत्राचा ऱ्हास: प्रत्येक यंत्राला काही आयुमर्यादा असते. काही वर्षानंतर यंत्राचे भाग खराब होण्यास सुरुवात होते आणि त्यामुळे यंत्राची प्रत खालावते. कृत्रिम बुद्धिमत्तेचाही काही उपयोग होत नाही.

४) अनुभवाने सुधारणा होत नाही : मनुष्याच्या बाबतीत असे म्हणतात की अनुभवाने माणसाला शहाणपण येते. अनुभव हा माणसाचा मोठा गुरु आहे. पण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीत मात्र हे अजिबात खरे नाही.

५) बेरोजगारी : कृत्रिम बुद्धिमत्तेचा हा तोटा सर्वात जास्त चर्चेला गेला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू होईल. फक्त हे नवीन तंत्रज्ञान सर्वांनी आत्मसात केले पाहिजे.

६) नैतिक प्रश्न : कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापरामुळे तसेच सातत्याने होणाऱ्या वाढीमुळे काही नैतिक प्रश्न निर्माण झाले आहेत. सर्वात मोठा प्रश्न आहे की, ग्राहकांच्या गोपनीय ड्युटीची सुरक्षितता कशी अबाधित ठेवता येईल. हा मोठा प्रश्न कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढीमुळे निर्माण झाला आहे.

**श्रेया मच्छिंद्र चौधरी**
**BA III**



# कृत्रिम बुद्धिमत्ता : उपयोग आणि आवश्यकता

गेल्या वर्ष अखेर म्हणजे दिनांक २ ते दिनांक ०४ डिसेंबर २०२४ दरम्यान बेलगेट येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आयोजित करण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा वैचारिक परीक्षा देणे आयोजन केल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्ता उपयोग आणि त्याची व्यावसायिक आवश्यकता या विषयावर व्यापक चर्चा झाली. याचाच पाठपुरवठा म्हणून केंद्र सरकारच्या तंत्रज्ञान व उच्च शिक्षण विभागातर्फे २०२५ हे वर्ष कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष म्हणून साजरे करण्याचा व त्यानिमित्ताने विविध कार्यक्रम उपक्रमांचे आयोजन करण्याचे महत्त्वपूर्ण व धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. त्यामुळे या विषयाचे महत्त्व नव्या संदर्भात अधोरेखित झाले आहे.


The relationship between technology and humans should be balanced. Technology is a powerful tool, but it should serve humanity rather than control it. Human values such as creativity, empathy, ethics, and critical thinking remain essential and cannot be replaced by machines.

In conclusion, technology has greatly improved human life by providing comfort, efficiency, and opportunities for growth. However, its benefits can be fully realized only when it is used wisely and responsibly. The future depends not only on technological progress but also on how humans choose to use technology for the betterment of society.

"Technology is at its best when it brings people together and enhances human potential."

**Gaurav Ingole**
**B.A.I**

# Technology

In a world without technology,
can you imagine how it would be?
To not have any lights.
We'll probably stay home at night.

In a world without technology,
we'll lose forms of connectivity.
We'll not have wifi or 3G,
distance will be as it should be.

However, without technology,
We won't have people far away,
because we can only walk on foot.
Most will live at home for good.

Without technology,
perhaps there'll be more sincerity,
where more people would be seen,
not looking at their phone screens.

Instead they'll stop and listen,
giving undivided attention,
to the people by their side.

Perhaps without technology,
we would have to do things manually.
Life may be tough physically.

But with technology,
is our life really that easy?
Is the world really as it should be?
Are people living in harmony?

**Neha Nemane**
**B.A II**

# Digital Dawn

The morning light breaks on screens and circuits,
A new day is born in lines of code and hope.
Digital pulses mimic the heartbeat of life,
In silent hums and glowing pixels, we awaken.
Each spark of light carries a promise of change,
A soft reminder that every sunrise writes a new story.

Wires echo the song of beginnings,
Data streams flow like rivers of possibility.
The world is reborn in the language of light,
A calm fusion of human dreams and digital art.
In the quiet glow, we find a shared breath,
A moment of connection between man and machine.

**Samyak Dhurandhar**
**B.A.I**

# Artificial Intelligence: The Mind We Made

In circuits born of human dreams,
A silent spark begins to gleam.
No beating heart, no soul to claim,
Yet wisdom answers when we name.
It learns the patterns of our days,
Deciphers thoughts in countless ways.
From ancient books to distant skies,
It sees the world through data's eyes.
It writes a song, it paints the dawn,
It helps the weak and carries on.
In hospitals, in schools, in space,
It leaves its gentle, growing trace.
But every gift must bear a guide,
With truth and ethics by its side.
For minds we build must never stray
From kindness lighting every way.
A tool, not master; friend, not king,
Its greatest power—the good we bring.
The future's pen is in our hand,
To shape tomorrow's wiser land.
Let humans dream and machines assist,
Together crafting what's been wished.
With heart and hope, let progress start—
Artificial Intelligence, powered by the human heart.

**Saloni Sadar**
**B.A.III**

# Artificial Intelligence

AI is clever, AI is new,
It learns from me, it learns from you.
It helps us write, it helps us read,
It gives us answers when we need.
It drives machines, it finds the way,
It makes our work more easy each day.
In schools, hospitals, farms, and space,
AI is growing in every place.
But AI cannot laugh or cry,
It cannot dream or wonder why.
A human heart is full of care,
Something no machine can share.
So let us use this gift with care,
With truth, respect, and love to share.
Together we can reach the sky,
With human minds and helpful AI.

**Kajal Sirsagar**
**B.A.III**

# AI and Students

AI is here, so smart and bright,
Helping students learn and write.
It solves our doubts, both day and night,
Making study easier and light.
It saves our time with every task,
Answers questions that we ask.
It opens doors to knowledge wide,
With endless learning by our side.
But we should not depend too much,
For books and teachers still matter as such.
Thinking, trying, and making mistakes,
Are how true learning really takes shape.
AI is a tool, not a guide for all,
We must stand strong, whether big or small.
With wisdom, effort, and dreams so high,
Students can shine—with the help of AI.

**Aniket Dabhade**
**B.A. II**




**Principal,
Dr. Sanjay Patil
addressing students
in Induction
Program**

**Dr.Nilima Deshmukh
talking about NEP
in Induction Program**



# मराठी वाङ्मय अभ्यास मंडळ वार्षिक अहवाल

विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्या विषयी आवड निर्माण व्हावी तसेच त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा या दृष्टीने सत्र २०२५–२६ मध्ये मराठी अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. वर्षभर अभ्यास मंडळाद्वारे विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा, सेमिनार, काव्यवाचन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांचे या सत्रामध्ये आयोजन करण्यात आले होते.

दि.०३–०१–२०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय पाटील होते. तर प्रमुख अतिथी म्हणून इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. नीलिमा देशमुख उपस्थित होत्या. यावेळी सावित्रीबाई फुले जीवन व कार्यया विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

दि.२१–०२–२०२६ रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाचे औचित्य साधून 'मातृभाषेचे महत्त्व' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

मराठी राजभाषा दिनाच्या पर्वावर दि.२७–०२–२०२६ रोजी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी वैखरी राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा साजरा करण्यात आला.

## मराठी वाङ्मय अभ्यास मंडळ कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | काजल क्षीरसागर | बी.ए. भाग ३ |
| उपाध्यक्ष | श्रेया चौधरी | बी.ए. भाग ३ |
| सचिव | दिपाली भोजने | बी.ए. भाग ३ |
| सदस्य | गौरव इंगोले | बी.ए. भाग –१ |
| सदस्य | रोहित डाबेराव | बी.ए. भाग–१ |
| सदस्य | योगिता गायकवाड | बी.ए. भाग १ |
| सदस्य | आरती इंगोले | बी.ए. भाग १ |

डॉ. संजय पाटील
प्राचार्य

प्रो. डॉ. हर्षा ढाले
मराठी विभाग प्रमुख

# इतिहास अभ्यास मंडळ अहवाल २०२५ २६

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयाच्या इतिहास विभागाद्वारे दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. अभ्यास मंडळ उद्घाटन, इतिहास अभ्यास मंडळाद्वारे व्याख्यान, प्रश्नमंजुषा स्पर्धा, सेमिनार, ग्रुप डिस्कशन इत्यादींचे आयोजन करण्यात येते. २०२५ २६ या वर्षामध्ये काही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पाल घराण्याचे सांस्कृतिक योगदान या विषयावर सर्वप्रथम सेमिनारचे आयोजन करण्यात आले. बी.ए. भाग एक सेमिस्टर दोन च्या विद्यार्थ्यांनी या सेमिनारचे आयोजन केले. पाल घराण्याच्या भारतीय संस्कृतीक इतिहासामध्ये अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. आपल्या कला शैली व सांस्कृतिक अभिसरणासाठी पाल घराणे प्रसिद्ध आहे. त्यानंतर तीन मार्च २०२६ रोजी प्रतिहार घराण्याचे सांस्कृतिक योगदान या विषयावर विद्यार्थ्यांनी सेमिनारचे आयोजन केले. प्रतीहार घराण्याचे योगदान भारतीय इतिहासामध्ये अनन्यसाधारण असे आहे. आपल्या कला आणि संस्कृतीसाठी प्रतिहार घराणे प्रसिद्ध आहे. या काळामध्ये अनेक साहित्यकृती ची निर्मिती झाली. या काळामध्ये अनेक वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती कला अस्तित्वात आल्या या संदर्भातले विवेचन विद्यार्थ्यांनी केले. दिनांक १३ मार्च २०२६ रोजी प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले. बी.ए. भाग दोन सेमिस्टर चार च्या विद्यार्थ्यांसाठी रजिया सुलतान या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी एकमेकांना प्रश्न विचारू व उत्तरे देऊन ऐतिहासिक ज्ञान वाढवण्यामध्ये सहकार्य केले. मेजर सब्जेक्ट मधील अनेक छोटे विषय या प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये घेतल्या गेल्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये अधिकाधिक भर पडली.

कृष्णा बोदडे, राहुल पाटोळे, संदीप मांडवेकर, धवल साखरकर, निलेश पांढरे, सुमित इंगळे, गौरव इंगळे, ओम पवार, योगिता गायकवाड इत्यादी अनेक विद्यार्थ्यांनी सेमिनार आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने २०२५ २६ या वर्षात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**डॉ.प्रमोद चव्हाण**
इतिहास विभाग प्रमुख
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे
कला महाविद्यालय खामगाव

# राज्यशास्त्र अभ्यास मंडळ अहवाल २०२५-२६

मानवी जीवनामध्ये राजकीय क्षेत्राला अतिशय महत्त्व आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी सह संपूर्ण राजकीय ज्ञान प्राप्त होऊन महाविद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी एक सुज्ञ नागरिक बनावा, तसेच विद्यार्थ्यांच्या स्वयं अध्ययनात आणि व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळावी या उद्देशाने महाविद्यालयांमध्ये राज्यशास्त्र अभ्यास मंडळ स्थापन करण्यात येते. सत्र २०२५ – २६ मध्ये राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते ते पुढील प्रमाणे.

१) दि.१५/८/२०२५ ला स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये तिरंगा रॅली काढण्यात आली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात थोर महात्म्यांनी आपले आत्मबलिदानाची माहिती विद्यार्थ्यांमध्ये रुजावी याकरता आणि राष्ट्रीय ध्वज,संविधान आणि राष्ट्राप्रती प्रेम विकसित व्हावे म्हणून तिरंगा रॅली विभागाच्या वतीने काढण्यात आली यामध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

२) दि.५/९/२०२५ ला महाविद्यालयामध्ये शिक्षक दिनानिमित्त विभागाच्या वतीने स्वयंशासन उपक्रम राबविण्यात आला. राज्यशास्त्र विभागाच्या अनेक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील संपूर्ण दिवसाचे कामकाज शिक्षकांपासून तर शिपायापर्यंत सांभाळले.त्यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचा यथायोग्य आदर सत्कार करून त्यांच्या प्रति अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कट भावना प्रकट केल्या.

३) दि.८/१०/२०२५ ला महाविद्यालयामध्ये शासकीय निर्देशानुसार एक पेड माँ के नाम (वृक्षारोपण व वितरण) अभियान राबवण्यात आले.विभागाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांद्वारे एक रोपटे महाविद्यालयात लावण्यात आले आणि एक रोपटे आपल्या घरातील परसबागेत किंवा शेताच्या बांधावर लावून त्यांची निगा राखण्याची सूचना देण्यात आल्या.

४) दि.२६/११/२०२५ ला महाविद्यालयामध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी संविधान जागृती बद्दल आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील सर होते.

५) ६/१२/२०२५ ला महाविद्यालयामध्ये महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि जीवन चरित्र याविषयी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले.सुरुवातीला बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांना वंदन केले.

६) दि.९/१२/२०२५ ला विभागाच्या वतीने महाविद्यालयामध्ये एड्स जनजागृती अभियान राबवण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय खामगाव येथील श्री दारमोडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना एड्स या दुर्धर आजाराबद्दल माहिती देऊन त्याचे निवारण करण्याचे अनेक उपाय सांगितले.

७) दि.१२/१/२०२६ ला महाविद्यालयामध्ये विभागाच्या वतीने राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. त्यानंतर निवडक प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद आणि जिजाऊ मा साहेबांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला.

८) दि.२०/२/२०२६ ला महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शिवछत्रपती जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रमोद चव्हाण उपस्थित होते. त्यांनी उपस्थिती विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्व, संघटन कौशल्य व राष्ट्रनिष्ठा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

**राज्यशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारिणी**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | कु.सलोनी रमेश सदार |
| उपाध्यक्ष | कु. स्वीटी संतोष बोचरे |
| सचिव | कु. आरती गजानन इंगोले |
| सहसचिव | कु. गौरी झरेकर |
| सदस्य | राहुल राजू पाटोळे |
| सदस्य | कु. रोहिणी ज्ञानदेव गव्हांदे |
| सदस्य | रोहित भास्कर डाबेराव |

**प्रा.गोपाल श्री राखोंडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला
महाविद्यालय, खामगाव, जी.– बुलढाणा.

# समाजशास्त्र अभ्यास मंडळ वार्षिक अहवाल
# सत्र २०२५ -२६

समाजशास्त्र हा विषय समाज मानवी वर्तन, सामाजिक संबंध आणि सामाजिक संस्था याचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारा विषय आहे. एवढेच नाही तर, समाजशास्त्रात प्रामुख्याने कुटुंब,जाती, वर्ग, धर्म, शिक्षण, संस्कृती, सामाजिक परिवर्तन,अनुचलन- विचलन स्त्री-पुरुषांचा सामाजिक दर्जा आणि भूमिका याचाही अभ्यास करण्यात येतो . समाजशास्त्राची प्रमुख उपयोगीता म्हणजे, सरकारी धोरणे, सामाजिक सेवा, शिक्षण,संशोधन आणि सामाजिक समस्या ही होय. बरेच विद्यार्थी समाजशास्त्र हा विषय घेऊन एमपीएससी यूपीएससी देखील करतात. या विषयाच्या अध्ययनामुळे विद्यार्थ्यांमध्ये मान- सन्मान, वृद्धीगत होतो. पुस्तकीं ज्ञानाबरोबरच सामाजिक ज्ञान देखील तितकेच महत्त्वाचे असते.

दिनांक ३० /९ /२०२५ रोजी समाजशास्त्र अभ्यास मंडळातर्फे अतिवृष्टी झालेल्या सांगली, सातारा आणि लातूर येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत फेरीचे आयोजन करण्यात आले होते. ही फेरी खामगाव शहरातून काढण्यात आली होती. या फेरीच्या माध्यमातून खामगाव शहरातील व्यापाऱ्यांकडून पैसे जमा करण्यात आले.महाविद्यालयाचे कर्मचारी यांच्याकडून देखील पैसे जमा करण्यात आले. व्यापारी आणि महाविद्यालयातील कर्मचारी यांचे एकूण सहा हजार रुपये उपविभागीय अधिकारी खामगाव यांच्यामार्फत मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये टाकण्यात आले.

दिनांक १८/ ०३/ २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या अंतर्गत बी.ए. भाग एकच्या विद्यार्थ्यांचा सेमिनार घेण्यात आला. सेमिनारचा विषय भारतीय संस्कृती आदर्श का आहे हा होता. बऱ्याच विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावीपणे सेमिनार दिला.

दिनांक ३० /३/२०२५ रोजी समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने बी.ए. भाग २ च्या विद्यार्थ्यांचा सेमिनार घेण्यात आला. सेमिनारचा विषय भारतातील स्त्रियांचा दर्जा आणि भूमिका हा होता. कु. कोमल खंडेराव आणि कांचन वाकोडे यांनी अतिशय विश्लेषणात्मक आणि अभ्यासपूर्ण सेमिनार दिला.

दिनांक २४/३/२०२६ रोजी इ. भाग ३ च्या विद्यार्थ्यांचा सेमिनार घेण्यात आला.सेमिनारचा विषय आदिवासी समाजातील युवा गृह पद्धती हा होता. या सेमिनारमध्ये कु.काजल क्षीरसागर, कु.कोमल कांबळे, कु. श्रेया चौधरी या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेऊन, प्रभावीपणे सेमिनार दिला.

**समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे कार्यकारीणी**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | कु.काजल क्षिरसागर | बी.ए. भाग ३ |
| उपाध्यक्ष | शिवम मोरखडे | बी.ए. भाग २ |
| कोषाध्यक्ष | कु.भावना जाधव | बी. ए. भाग ३ |
| सचिव | श्रेया चौधरी | बी.ए. भाग ३ |
| सदस्य | कु.कोमल कांबळे | बी. ए. भाग ३ |
| सदस्य | कु.प्रगती सुसतकार | बी. ए. भाग १ |
| सदस्य | कु.अस्मिता धुरंदर | बी. ए. भाग १ |
| सदस्य | कु.गायत्री पवार | बी. ए. भाग १ |
| सदस्य | चि.वैभव आखरे | बी. ए. भाग २ |

**संयोजक**
**डॉ. दयानंद राऊत**
**M.A.,M Phil, Ph.D, NET**
**समाजशास्त्र विभाग प्रमुख**

# क्रीडा व शारीरिक शिक्षण
# वार्षिक अहवाल सत्र ( २०२५-२६ )

खेळाडूंच्या क्रीडा गुणांना व नेतृत्व क्षमतेला चालना देण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग सदैव प्रयत्नशील असतो. या विभागातर्फे राज्यस्तरीय, राष्ट्रीय व विद्यापीठ स्तरीय स्पर्धेमध्ये भाग घेण्याकरता व यश संपादन करण्याकरता वेळोवेळी प्रोत्साहित केले जाते व त्या करिता विविध प्रकारचे प्रशिक्षण शिबिर सुद्धा आयोजित करण्यात येतात.

सत्र २०२५ २६ मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारे आयोजित विभिन्न क्रीडा स्पर्धा मध्ये आपल्या महाविद्यालयाने क्रॉस कंट्री ,मैदानी स्पर्धा, कबड्डी( मुले ) कबड्डी (मुली )खो–खो (मुले) व तलवारबाजी या विभिन्न क्रीडा स्पर्धा मध्ये सहभाग नोंदविला व या क्रीडा स्पर्धा मध्ये महाविद्यालयीन खेळाडूंनी आपल्या खेळ कौशल्याचे उत्तम प्रदर्शन केले.

सत्र २०२५_२६ मध्ये महाविद्यालयाचे क्रीडा क्षेत्रातील सुयश

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारे आयोजित आंतर महाविद्यालयीन तलवारबाजी (**Fencing**) क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयातील खेळाडू श्री. धवल साखरकर याने या क्रीडा प्रकारा कांस्यपदक प्राप्त केले तसेच आंतर विद्यापीठ तलवारबाजी क्रीडा स्पर्धेमध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करून महाविद्यालयाचा गौरवात भर टाकली, ही स्पर्धा गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर येथे संपन्न झाली.

अशाप्रकारे मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनात आपल्या महाविद्यालयातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाची वाटचाल सुरू आहे.

**प्रा. डॉ. गणेश विश्वकर्मा**
**संचालक,**
**क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग**

# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग अहवाल

मानवाची जी आज प्रगती झाली आहे. त्यामधे सर्वात मोठे योगदान हे ग्रंथांचे असून ही ग्रंथ एकत्रित मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे ग्रंथालय होय. मानवाला जेव्हा कळू लागले तेव्हा त्याने आपले विचार हे पुस्तकाच्या द्वारे शब्दबद्ध केले त्यांनी लावलेले असंख्य शोध, भौगोलिक, भौतिक, रासायनिक, आणि जीवशास्त्रीय संशोधनाचे माहिती आणि शोध त्याने ग्रंथाद्वारे जगासमोर मांडले आणि आजही ती माहिती आपल्यापर्यंत पिढ्यान पिढ्या ग्रंथालयाद्वारे होत आहे आणि अनंत काळापर्यंत होत राहील.

ग्रंथालयाशिवाय मनुष्य जगूच शकणार नाही हे आता सिद्ध झाले आहे. मानवाची उन्नती त्याचा सर्वांगीण विकास हा ग्रंथालयामुळे झाला असून यांचा शिवाय राहणारा व्यक्ती हा पशुप्रमाणे जीवन जगेल हे मात्र खरे आहे. आमच्या सहकार महर्षी स्वर्गीय भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाची सुरुवात सत्र २००७–०८ मध्ये . आणि . अभ्यासक्रमाची सुरुवात २००८–०९ मध्ये केली.

ग्रंथालय व ग्रंथालय माहितीशास्त्र विभाग अंतर्गत डॉक्टर एस आर रंगनाथन जयंती दि.१२/८/२५ ला. साजरी करण्यात आली होती त्यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील होते त्याचबरोबर कार्यक्रमाचे आयोजन डॉ. संदीप लांडे आणि सचिन कोल्हे यांनी केले या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे बी.लिब. आणि एम.लिब. चे संपूर्ण विद्यार्थी उपस्थित होते. त्याचबरोबर सामूहिक वाचन घेण्यात आले होते. यामध्ये बी.ए., बी.लिब. आणि एम. लिब. च्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. आणि त्याचबरोबर २७/०२/२६ ला महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय वैखरी साहित्य पुरस्कार च्या निमित्याने महाविद्यालयामध्ये ग्रंथा प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती  यामध्ये सर्वप्रथम ग्रंथ दिंडी काढण्यात आली होती. या ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटक अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष फ. मु. शिंदे हे होते. त्याचबरोबर या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव डॉ. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

त्यानंतर दिनांक २७/०३/२६ ला ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाअंतर्गत . आणि . च्या विद्यार्थ्यांची पेपर प्रेझेंटेशन घेण्यात आले होते यामध्ये ग्रंथालय आणि माहिती शास्त्र विभागाचे संपूर्ण विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. आणि त्याचबरोबर ग्रंथालय शास्त्र विभागाअंतर्गत दरवर्षीप्रमाणे विद्यार्थ्यांचे टूर व्हिजिट दिनांक १५/०४/२६ ला. श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथालय. शेगाव येथे आयोजित केली होती त्यामध्ये बी.लिब. आणि एम.लिब. चे संपूर्ण विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून संयुक्त आहे. त्यामध्ये यामध्ये एकूण ६५९७ ग्रंथ ,११ नियतकालिक,६ वर्तमानपत्र, ७२ कात्रण प्रकल्प, १४२ . चे प्रकल्प उपलब्ध आहे व २७ जर्नलचे बॅक व्हालूम , अभ्यासक्रमाचे सिल्याबस तसेच अमरावती विद्यापीठाच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध आहे.

ग्रंथालयामध्ये बऱ्याच प्रमाणात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो. त्यामध्ये ग्रंथालय संगणकीकरण झालेले आहे. यामध्ये या लिबसॉफ्ट आज्ञावलीचा उपयोग करण्यात आला आहे. त्याचबरोबर बारकोड सिस्टमचा सुद्धा उपयोग केला आहे व ग्रंथालयामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध आहेत. ग्रंथलाद्वारे काही सुविधा पुरल्या जातात. यामध्ये वाचन कक्ष सेवा संदर्भ सेवा देवाण–घेवाण सेवा प्रकलिपी सेवा, प्रश्नपत्रिका सिल्याबस आणि त्याचबरोबर ई–बुक आणि जर्नल उपलब्ध करून दिल्या जातात. येणाऱ्या काळामध्ये उत्तम प्रकारे साहित्य निवड व उत्तम प्रकारे सेवा देण्याचे मानस महाविद्यालयाचे आहे.

डॉ. संदीप लांडे
,
श्री सचिन कोल्हे
ग्रंथालय विभाग

# गृहअर्थशास्त्र विभाग अहवाल सत्र २०२५-२६

गृहअर्थशास्त्र हे जीवन शिक्षण आहे. कारण यामध्ये गृहिणीच्या गृह जीवनाशी निगडित असलेल्या सर्व विषयांचे अध्ययन करण्यात येते. त्यामुळेच हा विषय विद्यार्थीसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा तसेच सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सुद्धा महत्त्वाचा आहे. विद्यार्थिनीच्या अंगी असलेल्या कलागुणांना तसेच कौशल्यांना वाव मिळावा आणि विषयाची शास्त्रोक्त पद्धतीने ज्ञान मिळावे हा उद्देश साध्य होण्यासाठी सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव येथे पदवी स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये या शिक्षणाचा समावेश करण्यात आला.

या विषयांमध्ये अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थिनीच्या सुप्त गुणांना वाव मिळावा आणि त्यांचा विकास व्हावा. या दृष्टीने महाविद्यालयामध्ये या विषयांतर्गत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये दिनांक २३. ०९.२०२५ रोजी पोषण महिन्यानिमित्त महाविद्यालयात प्रथिने युक्त नाविन्यपूर्ण खाद्यपदार्थ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थिनींनी प्रथिने युक्त विविध नाविन्यपूर्ण खाद्यपदार्थ बनवून आणली. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय पाटील होते तर कार्यक्रमाच्या परीक्षक डॉ. नीलिमा देशमुख या होत्या. मुलींनी बनवलेल्या विविध नाविन्यपूर्ण डिश मधून खाद्यपदार्थाचे परीक्षण करण्यात आले व त्यातून तीन क्रमांक काढण्यात आले. यातील प्रथम क्रमांक बी.ए. भाग १ची विद्यार्थिनी अर्पिता सागर धुरंधर, द्वितीय क्रमांक बी.ए. भाग २ ची विद्यार्थीनी कोमल कडू खंडेराव. तृतीय क्रमांक बी.ए. भाग ३ ची विद्यार्थिनी सलोनी रमेश सदार यांनी मिळविला. क्रमांक प्राप्त विद्यार्थिनींना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

विद्यार्थिनींमध्ये आरोग्य आणि पोषण विषयक जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशास्तव पोषण महिन्याचे औचित्य साधून दिनांक २९/ ०९/ २०२५ रोजी महाविद्यालयात आरोग्य व पोषण विषयक मार्गदर्शन तसेच गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील हे होते कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सुरज देवी रामचंद्र मोहता महिला महाविद्यालय खामगाव येथील गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मेघा देशपांडे या होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना आहार, आरोग्य, मासिक पाळी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन अर्पिता धुरंदर बी.ए. भाग १ च्या विद्यार्थिनींनी केले. डॉ.मेधा देशपांडे यांनी गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यकारिणी घोषित केली.

विद्यार्थिनींना रोजगार विषयक ज्ञान मिळावे आणि रोजगार विषयक माहिती व्हावी यासाठी दि. १५. १. २०२६ रोजी खामगाव येथील शिवांगी पार्ले बिस्कीट फॅक्टरीला भेट देण्यात आली. यामध्ये विद्यार्थिनींना रॉ – मटेरियल पासून ते बिस्कीट बनवणे, त्याची पॅकिंग करणे,लेबलिंग करणे, मार्केटिंग करणे इत्यादी बद्दलची माहिती मिळाली. भेटीचे आयोजन गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मालती सातव यांनी केले. यामध्ये महाविद्यालयातील गृह अर्थशास्त्र विषयाच्या बीए भाग १,२ आणि ३ च्या सर्व विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे दिनांक १३/०३/२०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना आणि गृह अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माता व बालकांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. हर्षा ढाले ह्या होत्या तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पंचशील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज येथील डॉ. कवीश्वर विप्लव हे होते. आरोग्य शिबिरामध्ये माता आणि बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून २४.३.२०२६ रोजी गृह अर्थशास्त्र विभागाच्या वतीने टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तु स्पर्धा ,रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, सलाड डेकोरेशन स्पर्धा आणि पुष्परचना स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते.स्पर्धेमध्ये बीए १,२, दोन ३ च्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. स्पर्धेमधील सहभागी विद्यार्थ्यांमधून प्रथम,द्वितीय, तृतीय क्रमांक काढण्यात आले. व क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिकाचे वितरणही करण्यात आले. स्पर्धेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील हे होते तर परीक्षक महाविद्यालयाच्या इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. नीलिमा देशमुख तसेच मराठी विभाग प्रमुख डॉ.हर्षा ढाले ह्या होत्या. कार्यक्रमाचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मालती सातव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांचे उत्कृष्ट सहकार्य लाभले.

**गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारिणी खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | सलोनी रमेश सरदार | बी.ए. ३ |
| उपाध्यक्ष | काजल राम क्षीरसागर | बी.ए. ३ |
| सचिव | कांचन प्रकाश वाकोडे | बी.ए. २ |
| सदस्य | श्रद्धा मुकिंदा गव्हांदे | |
| सदस्य | कोमल कडू खंडेराव | बी.ए. २ |
| सदस्य | अर्पिता सागर धुरंदर | बी.ए. १ |
| सदस्य | आरती गजानन इंगोले | बी.ए. १ |

**प्रा.डॉ. मालती सातव**
**गृहअर्थशास्त्र विभाग**

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल २०२५ - २६

सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयांतर्गत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट शंभर मुलांचे आहे. दरवर्षी रासयो तर्फे समाज उपयोगी कामे केली जातात. बऱ्याच वेळा देशहितासाठी देखील कार्यक्रम राबविले जातात. जसे की पल्स पोलिओ अभियान. राष्ट्रीय कार्यात सहभागी होऊन राष्ट्रहित जपले जाते. रासेयो तर्फे अनेक प्रकारचे कार्यक्रम, उपक्रम, अभियान राबवले जातात. पुढच्या वर्षी यापेक्षा अधिक उपक्रमशील विद्यार्थी केंद्रित, समाजित देशहित जपणारे कार्यक्रमाचे आखणी करून त्याची अंमलबजावणी केली जाते जसे की प्लास्टिक मुक्त अभियान, वृक्षारोपण, मतदार जागृती रॅली, तिरंगा रॅली, लसीकरण, स्वच्छता अभियान, रासेयो स्थापना दिवस, गाडगेबाबा, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर यांची जयंती, रक्तदान शिबिर, एड्स जनजागृती कार्यशाळा, संविधान दिवस इत्यादी.

आंतरराष्ट्रीय योग दिवस

दि.२१/६/२०२५ ला महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रासोयो च्या स्वयंसेवकांना योगाचे महत्त्व कळावे आणि प्रत्यक्ष अनुभूती घेता यावी, तसेच अधिकाधिक योगाचा प्रसार होऊन समाज निरामय जीवन जगावा या उद्देशाने हा दिवस साजरा करण्यात येतो. मार्गदर्शक म्हणून योगाचार्य प्राध्यापक श्री अनिल मुलांडे सर हे उपस्थित होते. त्यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी सहा वाजता उपस्थित रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक, महाविद्यालयाचे कर्मचारी तथा नागरिक वृंदांना प्रत्यक्ष विविध प्रकारचे व्यायाम, असणे, प्राणायाम करून दाखवले आणि प्रत्यक्ष करूनही घेतले.

तिरंगा रॅली

दि.१५/८/२०२५ ला स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये तिरंगा रॅली काढण्यात आली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात थोर महात्म्यांनी आपले आत्मबलिदानाची माहिती विद्यार्थ्यांमध्ये रुजावी याकरीता राष्ट्रीय ध्वज, संविधान आणि राष्ट्राप्रती प्रेम विकसित व्हावे म्हणून तिरंगा रॅली विभागाच्या वतीने काढण्यात आली. यामध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

शिक्षक दिन

दि.५/९/२०२५ ला महाविद्यालयामध्ये शिक्षक दिनानिमित्त विभागाच्या वतीने स्वयंशासन उपक्रम राबविण्यात आला. राज्यशास्त्र विभागाच्या अनेक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील संपूर्ण दिवसाचे कामकाज शिक्षकांपासून तर शिपायापर्यंत सांभाळले.त्यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचा यथायोग्य आदर सत्कार करून त्यांच्याबद्दल अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कट भावना प्रकट केल्या.

राष्ट्रीय सेवा योजना दिन – उद्बोधन वर्ग

दि. २४/०९/२०२५ ला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रासेयो दिनानिमित्त उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्गाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. दयानंद राऊत सर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.गोपाल राखोंडे सर यांनी करून दिला. प्रा.डॉ. राऊत सर यांनी उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास, उपयुक्तता आणि महत्व विविध उदाहरणाद्वारे प्रस्तुत केले.

वृक्षारोपण व वितरण

दि.८/१०/२०२५ ला महाविद्यालयामध्ये शासकीय निर्देशानुसार एक पेड माँ के नाम (वृक्षारोपण व वितरण) अभियान राबवण्यात आले.विभागाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांद्वारे एक रोपटे महाविद्यालयात लावण्यात आले आणि एक रोपटे आपल्या घरातील परसबागेत किंवा शेताच्या बांधावर लावून त्यांची निगा राखण्याची सूचना देण्यात आल्या.

**वंदे मातरम गाण**

७/११/२०२५ रोजी वंदे मातरम या गीता १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्त सर्व जनमानसात देश भावना जागृत होण्यासाठी या गीताने बजावलेली भूमिका लक्षात घेऊन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थी प्राध्यापक व इतर शिक्षकेतर कर्मचाऱ्यासह सामूहिक वंदे मातरम गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कक्षामध्ये सर्वांनी मिळून वंदे मातरम गान करण्यात आले.

**संविधान दिन**

दि.२६/११/२०२५ ला महाविद्यालयामध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी संविधान जागृती बद्दल आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील सर होते.

**महापरिनिर्वाण दिन**

६/१२/२०२५ ला महाविद्यालयामध्ये महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि जीवन चरित्र याविषयी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले.सुरुवातीला बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांना वंदन केले.

**एड्स जनजागृती अभियान**

दि.९/१२/२०२५ ला विभागाच्या वतीने महाविद्यालयामध्ये एड्स जनजागृती अभियान राबवण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय खामगाव येथील श्री दारमोडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना एड्स या दुर्धर आजाराबद्दल माहिती देऊन त्याचे निवारण करण्याचे अनेक उपाय सांगितले.

**राष्ट्रीय युवा दिन**

दि.१२/१/२०२६ ला महाविद्यालयामध्ये विभागाच्या वतीने राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. त्यानंतर निवडक प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद आणि जिजाऊ मा साहेबांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला.

**शिवछत्रपती जयंती**

दि.२०/२/२०२६ ला महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शिवछत्रपती जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रमोद चव्हाण उपस्थित होते. त्यांनी उपस्थिती विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्व, संघटन कौशल्य व राष्ट्रनिष्ठा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

**संत गाडगेबाबा जयंती**

दि.२१/२/२०२६ ला महाविद्यालयामध्ये संत गाडगेबाबा जयंती राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील व प्रमुख वक्ते डॉ. गणेश विश्वकर्मा यांनी गाडगेबाबांचे प्रतिमेला हारातून करून वंदन केले व विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनाविषयी मार्गदर्शन केले. रासेयोतिल अनेक विद्यार्थ्यांनी सुद्धा संत गाडगेबाबा विषयी आपले मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे आयोजन रासेयो च्या वतीने प्रा.गोपाल राखोंडे सर यांनी केले.

**मा.फुले जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**

दि.१४/४/२०२६ ला महाविद्यालयामध्ये महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.सर्वप्रथम ऑफिस उपस्थितांनी महात्मा फुले व डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेला हर हर पण करून बंधन केले. प्राचार्य डॉ.संजय पाटील सर यांनी दोघांच्या कार्यांचा आढावा घेऊन त्यांच्या आदर्शावर वाटचाल करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

श्रमसंस्कार शिबिर

दि.९/२/२०२६ ते १६/२/२०२६ दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्त ग्राम मांडका येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये ५० स्वयंसेवकांनी दोन शिक्षक सहभागी झाले होते.या शिबिरामध्ये स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम, बौद्धिक कार्यक्रम, शोषखड्डे, बंधारा, पशुचिकित्सा शिबिर, बाल व महिलांचे आरोग्य तपासणी शिबिर, कृषी मार्गदर्शन शिबिर, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वेळेचे नियोजन आणि तणाव व्यवस्थापन आधी वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम घेण्यात आले.

**प्रा.गोपाल.श्री.राखोंडे**
**समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग,**
**सहकार महर्षी स्व भास्करराव शिंगणे कला**
**महाविद्यालय, खामगाव, जी.– बुलढाणा.**

# सांस्कृतिक विभाग अहवाल

सत्र २०२५ – २६ महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाअंतर्गत अनेक प्रकारचे कार्यक्रम घेण्यात येतात. महाविद्यालयीन युवकातील कलागुणांना वाव देणे हे सांस्कृतिक विभागाचे प्रमुख उद्दिष्टे आहे.बऱ्याच विद्यार्थ्यांमध्ये अनेक प्रकारचे कौशल्य कलागुण असतात. पण ते प्रकट करण्यासाठी विचार मंच नसतो.म्हणून सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून त्यांना विचारमंच उपलब्ध करून दिला जातो. भारताची सांस्कृतिक ओळख जतन करणे, कलाकारांना प्रोत्साहन देने,भावनिक एक्य निर्माण करणे, आणि मुलांना भारतीय संस्कृतीची जाणीव करून देणे, ही देखील सांस्कृतिक विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहेत.

दि.२४/ २/ २०२६ ते २५/ २ २०२६ या दरम्यान महाविद्यालयामध्ये दोन दिवशीय वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. पहिल्या दिवशी रांगोळी स्पर्धा,पुष्परचना स्पर्धा, डीश डेकोरेशन स्पर्धा, टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू तयार करणे इत्यादी स्पर्धा पार पडल्या. कमवा आणि शिका या विचारधारेला अनुसरून महाविद्यालयांमध्ये आनंद मेळावा घेण्यात आला. यानंतर दुसऱ्या दिवशी सामुदायिक नृत्य स्पर्धा, एकल नृत्य स्पर्धा, एकांकिका, गीत गायन स्पर्धा अशा अनेक स्पर्धा घेण्यात आल्या.यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय पाटील,डॉ. नीलिमा देशमुख,डॉ. हर्षा ढाले, डॉ. प्रमोद चव्हाण, डॉ. दयानंद राऊत उपस्थित होते. सर्व स्पर्धेचे मूल्यमापन प्रा अलका काळणे प्रा. अनिता सातव, डॉ. मालती सताव यांनी केले. संचालन डॉ. मालती सताव यांनी केले प्रास्ताविक डॉ. दयानंद राऊत यांनी केले. संपूर्ण स्नेहसंमेलनाचे आयोजन डॉ दयानंद राऊत यांनी इतर सर्व प्राध्यापकांच्या सहकार्याने केले होते. प्रत्येक स्पर्धेचे प्रथम,द्वितीय व तृतीय व क्रमांक देऊन, विद्यार्थ्यांना एक सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी डॉ. वासनिक, डॉ. संदीप लांडे, प्रा गोपाल राखोंडे बी. व्होक चे शिक्षक, आयटीआयचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रा. डॉ. दयानंद राऊत**
**सांस्कृतिक विभाग**

# राष्ट्रीय छात्र सेना अहवाल

राष्ट्रीय छात्र सेना ही देशात अंतर्गत असुरक्षित प्रसंगी नागरी संरक्षण सेवेसाठी मोलाचे कार्य करणारी छात्र संघटना आहे. २० नोव्हेंबर १९४८ ला विशेष कायदा मंजूर करून एन.सी.सी. ची स्थापना करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सैन्याविषयी आवड निर्माण करणे. देशाप्रती आदर, प्रेम असलेले साहसी युवक तयार करणे, हा या संघटनेचा उद्देश आहे.एन.सी.सी. हा वैकल्पिक विषय आहे. एकता व अनुशासन हे एन.सी.सी.चे ब्रीदवाक्य आहे. महाविद्यालयांमध्ये २०१२ –१३ पासून ३० छात्रांचे युनिट तयार करण्यात आले. सद्यपरिस्थितीत ३६ छात्रांचे युनिट मिळालेले आहे. या युनिटच्या सर्व क्षेत्रांची भरती १ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये २४ एस. डी. व १२एस डी( सीनियर डिव्हिजन) आहेत. या विभागाद्वारे विविध उपक्रम राबवण्यात आलेले आहे.२६ नोव्हेंबर संविधान दिवस तसेच एड्स जनजागृती मोहीम व पल्स पोलिओ सारखे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहे.तसेच समाज प्रबोधनासाठी मतदान साक्षरता दिन राबवण्यात आलेला आहे

डॉ.दीप्ती कुलकर्णी
एन.सी.सी. अधिकारी

# एक दिवसीय राष्ट्रीय परिषद अहवाल

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगाव, स्व. छगनलाल मुलजीभाई कढी महाविद्यालय, अचलपूर कॅम्प आणि श्रीमती कावेरीदेवी केदारमल अग्रवाल महाविद्यालय, मलकापूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद दि.०३ फेब्रुवारी २०२६ रोजी सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव येथे संपन्न झाली. मानवी विकासाचे पैलू: बहुआयामी दृष्टिकोनहा परिषदेचा विषय होता. उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव डॉ. सदगुण देशमुख तर उद्घाटक म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांची प्रमुख उपस्थिती होती. तर बीजभाषक म्हणून महाराजा कृष्णकुमारसिंहजी भावनगर विद्यापीठ, भावनगर येथील डॉ. जे. आर. सोनवणे, तसेच चिल्ड्रेन्स युनिव्हर्सिटी गांधीनगर येथील प्रा. डॉ. अश्विन निसारता, दादासाहेब तारे शिक्षण संस्थेचे सचिव श्रीपाद तारे, सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे स्मृती शिक्षण आणि आरोग्य प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दिलीपराव देशमुख प्राचार्य शक्ती सिंग राजपूत, प्राचार्य डॉ. संजय पाटील प्राचार्य काशिनाथ बराटे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

बीजभाषक डॉ .जे. आर. सोनवणे यांनी साहित्यातून मूल्यांची निर्मिती होऊन समृद्ध विचार प्रक्रियेचा विकास घडतो असे स्पष्ट केले. प्रा .डॉ. अश्विन निसारता यांनी विविध उदाहरणांच्या आधारे मानवी विकासाचे अनेक पैलू उलगडून दाखविले.

परिषदेचे दुसरे सत्र 'मानवी विकासात साहित्य आणि सामाजिक शास्त्र यांचे योगदान' या विषयावर झाले. या सत्राचे अध्यक्ष गो. से. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर होते. सामाजिक शास्त्रे मानवी विकासाला पूरक ठरणारी शास्त्रे आहेत, असे अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. प्रमुख वक्ते सिनेट सदस्य प्रा. डॉ. रवींद्र मुंद्रे यांनी सामाजिक शास्त्रांमध्ये मानवी विकासाचे विविध पैलू अंतर्भूत असल्याचे नमूद केले. या सत्रातील दुसरे वक्ते डॉ. सुरजप्रसाद शुक्ला यांनी अनेक साहित्यिकांच्या लेखनातून मानवी मूल्ये, संवेदना आणि सामाजिक जाणीव विकसित होऊन मानवी प्रगतीला योग्य दिशा मिळाल्याचे प्रतिपादन केले. या सत्राचे अध्यक्षपद गो.से. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी भूषविले. तिसऱ्या सत्रात प्राचार्य डॉ. रामेश्वर खडसन, प्राचार्य डॉ. गजानन शर्मा यांच्या उपस्थितीत संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. समारोपीय समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. काशिनाथ बराटे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. नामदेव ढाले यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सद्गुण देशमुख यांनी मानवी विकास साधायचा असेल तर माणसाने माणसाशी माणुसकीने वागणे आवश्यक असून प्रत्यक्ष कृतीतून तसेच आचार विचारातून मानवी मूल्ये जोपासली पाहिजेत, असे मत व्यक्त केले.

या राष्ट्रीय परिषदेला पंजाब, कर्नाटक, गुजरात तसेच मुंबई, पुणे, धुळे अहिल्यानगर, नांदेड सोलापूर, कोल्हापूर आदी भागातून एकूण २३५ शोधनिबंध प्राप्त झाले. परिषदेस विविध महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक व संशोधक उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. नीलिमा देशमुख तर आभार परिषदेच्या समन्वयक प्रा. डॉ. हर्षा ढाले यांनी मानले.

समन्वयक
प्रा. डॉ. हर्षा ढाले

आमचे भूषण

## क्रीडा विभाग



# धवल साखरकर

यास आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत कास्य पदक प्राप्त.
तसेच आंतर विद्यापीठ स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती
विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले




सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे स्मृती आंतर महाविद्यालयीन वादविवाद
स्पर्धेतील विजयी चमूस फिरती ढाल प्रदान करतांना प्राचार्य डॉ.संजय पाटील व इतर मान्यवर




'मानवी विकासाचे पैलू: बहुआयामी दृष्टिकोन' या विषया वरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी जर्नल्सचे प्रकाशन करतांना
संगाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ. मिलिंद बारहाते, संस्थेचे सचिव डॉ. सद्गुण देशमुख व इतर मान्यवर



वैखरी राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार २०२६ प्रसंगी उपस्थित मान्यवर डॉ. फ.मु. शिंदे,
रंगनाथ पठारे, राजन गवस, डॉ. सदानंद देशमुख, डॉ. श्रीपाद जोशी व डॉ. सद्गुण देशमुख